साप्ताहिक
# युगांतर
संपादक : डॉ. भालचंद्र कानगो

**आंतमध्ये...**

- देवभूमी केरळमधील हिंसाचार...
- काळ मोठा कठीण आहे
- भारतीय कम्युनिस्ट पक्षातर्फे मुलींना स्वसंरक्षणाचे धडे देणार!
- इतर काही मजकूर

वर्ष : ६४ अंक : ३७ पृष्ठे : १६ १६ ते २२ मार्च २०१७ (मूल्य ५/-रुपये - वार्षिक वर्गणी रु.२५०/-)

## भाजपचा उत्तर प्रदेश व उत्तराखंडमध्ये मोठा विजय! पंजाबमध्ये पराभव! गोवा-मणिपूरमध्ये मर्यादित यश!

कॉ. डॉ. भालचंद्र कानगो

उत्तर प्रदेश हे राज्य भारताचे हृदय समजले जाते. १८ कोटी लोकसंख्येचा हा प्रदेश! या राज्यात ८० लोकसभेच्या जागा आहेत व यापैकी भाजपने २०१४च्या निवडणुकीत ७२ जागा जिंकल्या व अंदाजे ४५ टक्के मते मिळविली होती. १९९२ साली बाबरी मशीद आंदोलनाने निर्माण झालेल्या उन्मादी हिंदुत्व लाटेवर स्वार होऊन भाजपने बहुमत मिळवून राज्य मिळवलं होतं. परंतु त्यानंतर कधी बसप तर कधी समाजवादी पक्ष यांचीच राजवट होती. दोन वेळा बसपला भाजपने पाठिंबा दिला होता. या सर्व वाटचालीत काँग्रेसची वाताहात होत होती. २००४ साली लोकसभेच्या १० जागा मिळाल्यावर काँग्रेस सुधारेल ही आशा खोटी ठरली व आज काँग्रेस हा या प्रदेशात फक्त ६ टक्के मते असलेला व ७ आमदारांचा पक्ष झाला आहे. या सर्व काळात आर्थिक क्षेत्रात खाऊजा धोरणच राबवले गेले परंतु आर्थिक प्रश्नांपेक्षा मंडलचा प्रभाव सतत जाणवत होता व मायावतींचा आधार दलित व त्यामध्ये चांभार जातीचा, तर मुलायम यांचा यादव समाज हा आधार होता. १९ टक्के मुस्लीम असलेला हा प्रदेश असल्यामुळे या समुदायाला आपल्या जवळ ठेवण्यासाठी बसप व समाजवादी पक्ष प्रयत्नशील होते. काँग्रेसचा उच्चजातीय आधार सरकला होता. मायावतींनी 'हाथी नहीं यह गणेश है!' ही घोषणा देऊन ब्राह्मण समुदायाला आपल्याबरोबर निवडणुकीत ठेवण्याचा यशस्वी प्रयत्न केला. परंतु नंतर ही भट्टी काही जमली नाही.

आज २०१७ साली भाजपने ४०३ पैकी ३१६ जागा मिळवून मुस्लीम मतांशिवाय निवडून येणे शक्य आहे हे दाखवून दिलं. स्युडो सेक्युलर असं इतर पक्षांना सतत म्हणत भाजपनं मुस्लिमांच्या विरोधात हिंदू मते जुळवली. दुसरीकडे चांभार वगळून इतर छोट्या दलित व ओबीसी जातीलाही सामावून घेण्याची खेळी यशस्वी केली. त्याचबरोबर केंद्रात सत्ता असल्याचा वा कॉर्पोरेट जगाचा भरघोस पाठिंबा असल्याचाही फायदा होताच.

बिहारप्रमाणे अखिलेश व राहुल गांधी यांनी एकत्र येऊन पर्याय देण्याचा असफल प्रयत्न केला. काँग्रेस बरोबर जाऊन फायदा होत नाही, नुकसान होते हा अनुभव या पुढे भाजपविरोधात आघाडी करताना इतर पक्ष निश्चितच विचारात घेतील!

मंडलचा प्रभाव ओसरला असा निष्कर्ष काहींनी काढला आहे परंतु हे अर्धसत्य आहे. मंडलचा फायदा बहुसंख्य असलेल्या यादवांना मिळाला त्यामुळे यादव विरोधी सर्व ओबीसी, हिंदुत्वाच्या झेंड्याखाली एकत्र करणे भाजपला सोपे गेले.

महाराष्ट्रातही हे घडल्याचे आपण पाहत आहोत. मंडल प्रभावानंतर आता भाजपचा हिंदुत्व अजेंडा कमजोर झाला असे आग्रहाने मानणारे काही होते. त्यांना आता पुनर्विचार करणे भाग पडणार आहे!

या निकालानंतर काही माध्यमे हा जातीय राजकारण व संकुचित प्रादेशिक पक्षांचा व विचारांचा पाडाव आहे व विकासाचे राजकारण व गरिबांच्यासाठी नरेंद्र मोदींनी केलेल्या योजना यांचा विजय आहे असे मांडत आहेत. नोटाबंदी हा विकास नाही हे सांगणारे अनुभव सर्वांना आहे. गॅस सिलेंडर सोडल्यास गरिबांसाठी एकही नवी योजना जाहीर केलेली नाही; जाहिरातबाजी मात्र प्रचंड प्रमाणात होत आहे. त्याचा प्रभाव पडतोच! स्वत:



वाढत्या काळात होत आहे व त्यामुळेच भाजपचे यश दिसते आहे! पंजाब, मणिपूर व गोवा या राज्यांत भाजपला अपेक्षित यश मिळाले नाही. पंजाबमध्ये दारुण पराभव झाला. आता गोवा व मणिपूर येथे सत्ता व पैसा यांच्या साह्याने भाजप सरकार स्थापन करणार हेपण समोर येत आहे. २०१९ सालचे भाजपचे आव्हान पेलण्यासाठी विरोधी पक्षांना आतापासूनच गांभीर्याने तयारी करावी लागणार आहे.

डाव्या पक्षांनी निवडणूक प्रक्रियेकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. मतदारसंघ बांधणे, प्रचार यंत्रणा सर्व आधुनिक तंत्राचा वापर करून उभी करणे व सर्वात महत्त्वाचे म्हणजे पर्यायी विकास नीती मांडणे व त्याचबरोबर सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या विरोधात मोठी सांस्कृतिक, सामाजिक चळवळ उभारणे आवश्यक आहे. आम आदमी पक्षाला पंजाबात मोठी आशा होती परंतु त्यांना २४ जागा मिळाल्या व गोव्यात एकही नाही. आम आदमी हा नवीन पक्ष आहे व राजकारणात मध्यमवर्गाच्या साह्याने भाजपला पर्याय उभा करण्याचे स्वप्न पाहत आहे; परंतु या निकालानंतर त्यांनाही पुनर्विचार करावा लागेल. अर्थात, पंजाबमध्ये प्रथमच निवडणूक लढवून त्यांनी २४ जागा मिळविल्या हेपण विचारात घ्यावेच लागेल.

नरेंद्र मोदींनी आपल्या भाषणांत स्मशान, कब्रस्तान व भ्रष्टाचार, कायदा सुव्यवस्था हेच मुद्दे मांडले. विकासाचे नाही! उलट भाजपच्या अनेक नेत्यांनी या दरम्यान जाणीवपूर्वक हिंदू-मुस्लीम तणाव वाढेल अशी वक्तव्ये केली; ज्यात गोरखपूरचे योगी आदित्यनाथ आघाडीवर होते!

वर्गीय राजकारणाचा प्रभाव दिसला नाही कारण डाव्यांना मिळणारी मते नगण्य आहेत व कामगार भागांतही भाजपच निवडून आला आहे असे दाखले दिले जातात. खरं पाहता भारतात आज गेल्या ७० वर्षांत आर्थिक धोरणाचा फायदा मिळून मोठा मध्यमवर्ग तयार झाला आहे. त्याला आर्थिक विकासाचे आकर्षण आहे. दुसरीकडे मुस्लिमांचा राग व सध्याच्या दहशतवादाच्या आंतरराष्ट्रीय वातावरणात भीतीही आहे. याचा फायदा नवीन आर्थिक धोरणाचे समर्थक, समाजवाद विरोधी, मुस्लीम विरोधी, हिंदुत्ववादी भाजपला मिळत आहे. काँग्रेस नवीन आर्थिक धोरणाचा पुरस्कर्ता होता व आहे परंतु राष्ट्रीय चळवळीचा भाग असल्यामुळे समाजवाद व धर्मनिरपेक्षतेची भाषा वापरत असे व आहे. नेमके हेच मध्यमवर्गाला रुचत नाही.

दुसरीकडे हा वर्ग सांस्कृतिक विचार व आचारांचा वाहक आहे. त्याला गेल्या ३० वर्षांत सातत्याने हिंदुत्वाचे डोस पाजण्यात आले आहेत. विशेषत: धार्मिक सण व देवळे यांना आलेले अनन्यसाधारण महत्त्व व मिळणारी प्रसिद्धी हे स्पष्ट करते. समाजवाद आणि गरिबी यांची सांगड तो घालतो. त्यांना गरिबांचा तिटकारा व गरिबांना मिळणाऱ्या सवलती म्हणजे पैशांची नासाडी वाटते! या मध्यमवर्गाची व कॉर्पोरेट जगाची दोस्ती या चंगळवादाच्या जमान्यात पुनर्जीवनवादी परंपरांच्या

मणिपूर व गोवा येथील अस्थिरता भारताच्या दृष्टीने अडचण ठरू शकते. मणिपूर व गोव्यामध्ये काँग्रेस नंबर एकचा पक्ष म्हणून जरी असला तरी सरकार बनविण्यात ते मागेच राहिले आहेत. गोव्यामध्ये पर्रिकर यांना पाठवून बहुमत मिळवून भाजपने सत्ता स्थापन केली आहे. परंतु मणिपूरमध्ये सत्ताबाजार होण्याची चिन्हे आहेत. लोकशाही प्रथा डावलून हा व्यवहार होत आहे व त्यासाठी पूर्वीच्या सरकारप्रमाणे भाजपही राज्यपालपदाचा दुरुपयोग करीत आहे.

भारतीय राजकारणाचा प्रांत, दिशा व आधार बदलत आहे व याचे नीट आकलन केल्याशिवाय पुरोगामी शक्तींना यश येणार नाही हाच संदेश या निवडणुकीतून मिळतो आहे.

❑

**(संपर्क : कॉ. डॉ. भालचंद्र कानगो - ९४२२२१२२६५)**

# देवभूमी केरळमधील हिंसाचार थांबला पाहिजे !

## प्राचार्य आनंद मेणसे

निसर्गाचे वरदान लाभलेल्या केरळची ओळख देवभूमी अशीही आहे. आपल्या देशातील एक वैशिष्ट्यपूर्ण व सुसंस्कृत राज्य म्हणून केरळकडे पाहिले जाते. अशा या देवभूमीत सध्या जो हिंसाचार माजला आहे तो थांबावयास हवा. असेच कुणीही म्हणेल. हा हिंसाचार थांबविता येणे सहज शक्य आहे. पण तसे न करता हिंसाचाराचे भांडवल करत भाजपने हा विषय अकारण देशव्यापी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. सध्या केरळचे नेतृत्व पिनाराई विजयन हे मार्क्सवादी विचारवंत करीत आहेत. त्यांच्याविषयी बोलताना मध्यप्रदेशातील ज्येष्ठ संघ प्रचारक कुंदन चंद्रावत काय म्हणाले आहेत हे ध्यानात घेतले तर भाजपला हिंसाचार थांबवायचा आहे की वाढवायचा आहे याची कल्पना येऊ शकते. कुंदन चंद्रावत हे उज्जैनचे असून ते म्हणाले आहेत, की पिनाराई विजयन यांचे मुंडके मारून जो कोणी आणेल त्यास आपण एक कोटी रुपयांचे बक्षीस देण्यास तयार आहोत. इतके बक्षीस देण्याची आर्थिक कुवत आपणाकडे निश्चितपणे आहे. गोध्रा अग्निकांडानंतर गुजरातमध्ये जी दंगल झाली त्या दंगलीत आम्ही दोन हजार लोकांना ठार मारले, याची ते अभिमानाने कबुली देतात. तर भारतमातेच्या गळ्यात तीन लाख मुंडक्यांची माळ घालण्याचा मानस ते जाहीरपणे बोलून दाखवतात. यावरून त्यांची मानसिकता दिसून येते. अशी जर मानसिकता असेल तर हिंसाचार होणार नाही तर काय होणार?

केरळमध्ये आज मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालील डाव्या आघाडीचे सरकार अस्तित्वात आहे. केरळमधील जनतेने डाव्या आघाडीवर विश्वास ठेवून त्यांना भरघोस मते दिली. केरळ हे आज देशातील सर्वात साक्षर राज्य मानले जाते. तेथील काही जिल्हे तर शंभर टक्के साक्षर आहेत. क्रिडा क्षेत्रामध्ये केरळ पूर्वीपासूनच आघाडीवर आहे. 'स्प्रिंट क्वीन' असे जिला म्हटले गेले ती पी. टी. उषा केरळचीच. सहकार क्षेत्रामध्ये पूर्वीपासून केरळ आघाडीवर आहे व तेथील सहकार क्षेत्र भ्रष्टाचारापासून मुक्त आहे. अलीकडच्या काळात पर्यटन क्षेत्रातही केरळचा क्रमांक पहिला आहे. देशाला परकीय चलन मिळवून देण्यात अग्रेसर असलेले राज्य म्हणजे केरळ.

केरळची धार्मिक रचना पाहता तेथे हिंदू, ख्रिश्चन आणि मुसलमान हे जवळजवळ समसमान आहेत. हिंदू धर्मियांची संख्या थोडी अधिक आहे. पण तेथे कधीही जातीय दंगली होताना दिसत नाहीत. एक धार्मिक सलोखा तेथील जनतेने आचरणात आणला आहे. गुरुवायूर, अयप्पा स्वामी, पद्मनाभ मंदिर ही मंदिरे जगप्रसिद्ध आहेत. केरळमधील तिन्ही धर्मिय लोक तसे धार्मिकच आहेत. पण अशा धार्मिक प्रवृत्तीच्या जनतेने मात्र सातत्याने तेथील कम्युनिस्ट चळवळीला साथ दिली आहे, हे विशेष म्हणता येईल. थोडेसे मागे पाहता असे दिसते, की केरळने जगात इतिहास घडविला. सन १९५७ सालात लोकशाही मार्गाने पहिल्यांदा कम्युनिस्ट पक्षाचे सरकार केरळमध्ये स्थापन झाले. कम्युनिस्ट पक्ष लोकशाही मार्गाने सत्तेवर येऊ शकतो याची प्रचीती यावेळी आली. पूर्वी असे घडले नव्हते. म्हणून केरळ हा जगभरात कौतुकाचा विषय झाला. थोर विचारवंत ई.एम.एस. नंबुद्रीपाद यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या या सरकारने जनतेच्या हिताची अनेक कामे करून आपला पाया भक्कम केला. पण तत्कालीन केंद्र सरकारने किरकोळ कारणे दाखवत १९५९ साली हे सरकार बरखास्त केले. या बरखास्तीमुळे केरळमधील कम्युनिस्टांना देशभर सहानुभूती मिळाली व त्यामुळे केरळमधील कम्युनिस्ट चळवळीत कमालीची वाढ झाली.

केरळ ही जर देवभूमी असेल, जनता धार्मिक असेल तर मग अशा ठिकाणी कम्युनिस्टांऐवजी आम्ही असावयास हवे असे भाजपला वाटणे स्वाभाविक आहे. पण अनेक प्रयत्न करूनही जेव्हा केरळमध्ये भाजपला कम्युनिस्टांना पर्याय देता आला नाही तेव्हा तेथे त्यांनी वेगळ्या प्रकारे संघर्ष उभा करण्यास सुरुवात केली.

इथे आणखी दोन उदाहरणे नोंदवता येतील. ज्या फैजाबाद जिल्ह्यात अयोध्या आहे त्या फैजाबाद मतदारसंघातून कम्युनिस्ट पक्षाचे उमेदवार मित्रसेन यादव लोकसभेवर निवडून गेले. तसेच हिंदू धर्मियांसाठी जी पवित्र भूमी मानली जाते त्या बनारस विधानसभा मतदारसंघातून भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉ. उदल हे नऊवेळा निवडून गेले. जेथे कालीमातेचे मंदिर आहे त्या बंगालवर कम्युनिस्टांनी ३३ वर्षे राज्य केले. जगातील एकमेव हिंदू राष्ट्र असे ज्याचे वर्णन करण्यात येईल त्या नेपाळमध्ये सध्या तेथील कम्युनिस्ट पक्षाची राजवट आहे. त्यामुळेच संघ परिवारातील लोकांना संताप येतो. जेथे आपले राज्य असावयास हवे तेथे कम्युनिस्टांची राजवट कशी या मानसिकतेतून ते पाहत असल्यामुळे पुढे अनेक गोष्टी घडलेल्या आहेत.


निवडणुकीच्या माध्यमातून आपण केरळमधील कम्युनिस्टांचा पराभव करू शकत नाही तर किमान इतर कारणानी तरी केरळमधील कम्युनिस्टांचे सरकार अडचणीत आणून ते बरखास्त करता येईल काय असा विचार ही मंडळी करीत असावीत.

*(पान ५ वर)*

# काळ मोठा कठीण आहे

कॉ. राजन बावडेकर

'प्रतिद्वंद्वी' हा सत्यजित रे यांचा १९७० मधील सिनेमा. सिनेमात एक प्रसंग असा. नायक धृतिमान चॅटर्जी नोकरीसाठी एका ठिकाणी मुलाखतीसाठी म्हणजे इंटरव्ह्युसाठी गेलेला असतो. बऱ्याच वेळाने त्याचा नंबर लागतो. त्याची शैक्षणिक पात्रता, पदवीचे विषय आणि मिळावयाच्या नोकरीतील काम यात काहीही साम्य नसते, ताळमेळ नसतो. त्याचा इंटरव्ह्यु घेणारे त्याबद्दल तटस्थ निरपेक्षपणे पण मग्रुरीने संक्षेपात त्याला विचारतात देखील, "तुझ्या शिक्षणाचा व ज्या कामासाठी नोकरी आहे त्याचा काहीही संबंध नाही." तेव्हा बेकारीमुळे अशा गोष्टी कराव्या लागतात. वाढती महागाई, त्यामुळे कुटुंबाला हातभार लावण्यास, जगण्यासाठी अशा गोष्टी नाइलाजाने कराव्या लागतात असा त्याचा प्रतिवाद असतो. अशी थोडावेळ जुजबी प्रश्नोत्तरे झाल्यावर इंटरव्ह्यु कमिटीतील एक सदस्य त्याला प्रश्न विचारतो, "गेल्या दशकातील आवर्जून नोंद घेण्यासारखी जागतिक घटना कोणती?"




आपला नायक क्षणभरच विचार करून सांगतो, "व्हिएतनाम युद्ध" तेव्हा प्रश्नकर्ता विचारतो, "नक्की! दुसरी कुठली एखादी त्याहून महत्त्वाची घटना नाही?" त्याबरोबर दुसरा कमिटी सदस्य विचारतो, "मनुष्याने चंद्रावर टाकलेले पाऊल ही घटना महत्त्वाची नाही का?" मिनीटभर स्तब्ध राहत आपला नायक (धृतिमान चॅटर्जी) विचारपूर्वक उत्तरतो, "विज्ञान आणि अवकाश शास्त्रातील प्रगतीमुळे चंद्रावर पाऊल ठेवण्याची शक्यता दृष्टीपथात होतीच, परंतु सर्वसामान्य माणसांची जिद्द, ऊर्मी, उमेद यांमधून महाबलाढ्य, अत्याधुनिक शस्त्रांनी परिपूर्ण, असंख्य साधनसुविधांनी युक्त अशा साम्राज्यशाहीचा पराभव ही खरोखर मानवाच्या इतिहासातील आवर्जून नोंद घ्यावी अशी घटना आहे." त्याबरोबर स्तिमित झालेल्या प्रश्नकर्त्यात्रयींपैकी एकजण त्यास विचारतो, "तु कम्युनिस्ट आहेस का?"

नायकाच्या चेहऱ्यावर किंचित हास्य उमटतं, पण मलूल किंवा त्यापेक्षाही प्रश्नकर्त्यांच्या शक्यतांवर खेदजनक प्रतिक्रिया व्यक्त करणारं. आपला नायक सांगतो, "व्हिएतनाम युद्धाविषयी सांगणं आणि कम्युनिस्ट असणं याचा संबंध काय?"

त्याला जायला सांगतात. इथे शॉट व सीन संपतो. सत्यजित रे रूढार्थाने कम्युनिस्ट नव्हते, किंबहुना सहप्रवासी म्हणण्याइतपतही नव्हते. पण त्यांच्या शहरांवरच्या, गावाकडच्या त्रिधारा चित्रपटांमध्ये फार सहज, सुलभ रितीने तत्कालीन किंवा आजही असणाऱ्या व्यवस्थेतील पोकळपणा, व्यवस्थेची बिंगं, महाबलाढ्य साम्राज्यशाहीचा, भांडवलशाहीचा मग्रुरी संक्षेप त्यांनी चित्रपटांतील अनेक दृश्यांद्वारे दाखवलाय. त्यांच्या शहरांची पार्श्वभूमी असलेल्या अशाच 'जनअरण्य' ह्या चित्रपटातही नोकरीसाठी घेण्यात येणाऱ्या इंटरव्ह्यु (मुलाखतींचे) असेच विदारक शॉट्स् आहेत. 'जनअरण्य'मध्ये मुलाखतकर्ते नायकाला अनेक प्रश्न विचारतात ज्याचा शिक्षणाशी, कामाशी अर्थाअर्थी संबंध नसतो. पण कमालीच्या सिनेमॅटीक पद्धतीने प्रश्नांची सरबत्ती इंटरव्ह्युसाठी फिरता फिरता बेजार झालेल्या उमेदवारावर करतात. "चंद्राचे वजन काय?" नायक दबकतच विचारतो "याचा नोकरीतील कामाशी काय संबंध?" मुलाखतकर्ता गुर्मीतच डाफरतो, "उत्तर माहितेय का नाही?" नायक दु:खद चेहऱ्याने सांगतो "नाही." इथे शॉट संपतो. कृष्णधवल चित्रपटातील सत्यजित रे यांच्या जादुई कॅमेऱ्याचा स्पर्श झालेल्या सिनेमातील सीन्समधून बेरोजगारी, भूक, शोषण, हक्क, क्रौर्य, यांची भीषणता मनात कुठेतरी घर करून बसायची. नवस्वतंत्र देशांतील प्रश्न, समस्या, विचारप्रवाह आदींचे वैश्विक परिमाणही समजून यायचे. वास्तविक त्यावेळी आताच्यासारखा माहितीचा महापूर नव्हताच. येऊन जाऊन प्रिंट मीडिया न् सिनेमे, आकाशवाणी बस्स! तरीसुद्धा व्हिएतनाम युद्धाची वास्तव नोंद घ्यावीशी रेंच्या नायकाला वाटली आणि त्यांना आता कुणाचे हस्तक (!) म्हणायचे? पण त्यांच्या विरोधकांच्या कपाळावरची शीर तडकली.

का नाही तडकणार? आपल्या बंगाल, कोकणामधील असलेल्या गरीब शेतकऱ्यांसारखीच साधारण अंगकाठी असणाऱ्या व्हिएतनाम्यांनी महाबलाढ्य, मग्रूर साम्राज्यवादी अमेरिकेस अशी लाजिरवाणी चपराक लागावली असेल तर त्यांच्या समर्थकांना वैषम्य वाटणारच, त्यांची शीर तडकणारच.

पण त्यापेक्षाही कौतुकास्पद दखल घ्यावी अशी वाटण्याजोगी प्रतिक्रिया नायक धृतिमान चॅटर्जींची होती. कुठल्या कोपऱ्यातील बेकार सामान्य तरुण. जगण्याचे असंख्य प्रश्न. तरीसुद्धा त्याला व्हिएतनामचा विजय ही जागतिक नोंद घेण्याची गोष्ट वाटते. यातून परिघाबाहेरची संवेदनशीलता, समज, परिपक्वता दिसते

असं म्हटल्यास वावगं वाटू नये. 'आमार नाम, तोमार नाम, व्हिएतनाम ! व्हिएतनाम!' ह्या घोषणा त्या काळी आसमंतात घुमायच्या. आजही त्या काळावर पोसलेल्यांना त्यांचे प्रतिध्वनी ऐकू येतात व त्यात वावगं असं काहीच नाही. ब्रिटिश, फ्रेंच, पोर्तुगीज आदी युरोपीयन साम्राज्यशाहीच्या जोखडातून आशिया, आफ्रिका आदी खंडांतील असंख्य नवस्वतंत्र देशांत नव्या विचारांचे धुमारे दिसत होते आणि प्रश्नसुद्धा. त्या काळावर अवीट छाप होती क्युबाची, व्हिएतनामची, हो-चि-मिन्हची, फिडेलची. आणि ह्या सर्वांवर छाप होती, प्रभाव होता किंबहुना त्यांच्या जीवनाची प्रेरणा होती ती म्हणजे १९१७ मधील बोल्शव्हिक क्रांतीची, रशियन क्रांतीची, सोव्हिएत युनियनची. ज्या क्रांतीच्या शताब्दी उत्सवाची सुरुवात ७ नोव्हेंबर २०१६ रोजी झाली. आणि सांगता येत्या ७ नोव्हेंबर २०१७ रोजी तर शतकपूर्ती सोहळा पुन्हा वर्षभर २०१८ पर्यंत चालेल.

आजचे प्रश्न वेगळे आहेत असं म्हणण्याची एक 'स्टाईल' आहे. प्रश्न तेच आहेत, किरकोळ तपशील बदललेत आणि आपल्या शत्रूंनी त्याला अधिकच चकवा देणारं स्वरूप दिलंय. त्यामुळे 'कन्फ्युजन' होतंय. महाराष्ट्रातल्या म्युनिसिपाल्टींचे, जिल्हापरिषदेचे, पंचायतींचे निकाल लागले, हा अंक हाती आल्यावर पाच राज्यांचे निकालसुद्धा राजकारणासकट स्पष्ट होतील. सत्यजित रेंच्या चित्रपटांतील प्रसंगांनी लेखाची सुरुवात झाली आणि लेख कुणीकडे भरकटला असं वाटण्याची दाट शक्यता आहे. पण ह्या सर्व बुर्झ्वा शक्यता आक्रमकपणे नामशेष करायला हव्यात आणि सुरुवातीच्या प्रसंगातील दाखवलेल्या प्रेरणा पुन्हा नव्या जोमानं, नव्या चेहऱ्यानं, स्वरूपानं उभ्या करायला हव्यात, कारण बाहेर काळ मोठा कठीण आहे! ❑

**(संपर्क : कॉ. राजन बावडेकर - ९८२१४४९०५९)**

---

*(देवभूमी केरळमधील हिंसाचार... पान ३ वरून)*

त्यातूनच तेथील वातावरण संघर्षमय झालेले असावे. दोन राजकीय पक्षामध्ये वैचारिक मतभेद असू शकतात. पण याचा अर्थ असा नव्हे की या दोघानी हिंसक संघर्ष करावा. अलीकडच्या काळात केरळमध्ये राजकीय हिंसाचाराच्या अनेक घटना घडलेल्या आहेत हे खरे आहे. पुढील काळात त्या टाळताही येतील. पण त्यासाठी इच्छाशक्ती हवी. तेथील सध्याचे वातावरण पाहता आणि भाजपच्या नेत्यांची मानसिकता ध्यानात घेता पुढील काळात त्यांना काय करावयाचे आहे याचा एक प्राथमिक अंदाज बांधता येतो.

येनकेनप्रकारेण केरळमधील वातावरण तापवत ठेवायचे. संघर्ष जारी ठेवायचा की जेणेकरून एके दिवशी हे राज्य बरखास्त करता येईल. त्यामुळे तेथील राज्यकर्त्यांवर सध्या ही जबाबदारी आहे की त्यांनी संघर्ष आटोक्यात आणला पाहिजे. संघर्ष वाढणार नाही याची काळजी घेत. कायदा व सुरक्षा अबाधित ठेवली पाहिजे. केरळमध्ये पुढे काय होईल हे एका गोष्टीवर अवलंबून आहे. उत्तर प्रदेश विधानसभेसाठी जी निवडणूक घेण्यात आली त्या निवडणुकीत विजय कोणाचा होईल यावर केरळचे भवितव्य अवलंबून राहील. उत्तर प्रदेशाच्या विधानसभेत जर भाजपाला बहुमत मिळाले तर केरळबाबत केंद्र सरकार आक्रमक धोरण घेऊ शकते व केरळचे सरकार बरखास्तही करू शकते. पण जर का उत्तर प्रदेशात भाजपला विजय मिळाला नाही तर मात्र भाजप आक्रमक धोरण सोडून देईल व केरळमध्ये संघर्षात उतरणार नाही.

मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांचे मुंडके कापा अशी भाषा जेव्हा वापरली गेली तेव्हा केरळमधील जनतेमध्ये विजयन त्यांच्याविषयी सहानुभूतीची लाट उसळली. ते सरकार पूर्वीपेक्षा अधिक आज बळकट झाले आहे. त्यांच्या लोकप्रियतेत वाढ झाली आहे. याचा अर्थच असा की केरळमधील जनतेला तेथे होत असलेला हिंसाचार अजिबात मान्य नाही. हा हिंसाचार रोखण्यासाठी केरळ राज्य सरकारने हिंसाचार विरोधी विशेष पोलीस दलाची स्थापना करून हा हिंसाचार लवकरात लवकर रोखून दाखवावा. म्हणजे विरोधकांची बोलती बंद होऊन जाईल. ❑

## गुलबर्गा येथे होऊ घातलेले आठवे कॉ. अण्णा भाऊ साठे साहित्य संमेलन स्थगित

आठवे कॉ. अण्णा भाऊ साठे साहित्य संमेलन १९ व २० मार्च २०१७ रोजी गुलबर्गा येथे होणार होते. परंतु काही अपरिहार्य कारणांमुळे होणारे संमेलन अनिश्चित काळापर्यंत स्थगित करण्यात आले आहे. सबंधित कॉम्रेड्स, संस्था, मंडळींनी याची कृपया नोंद घ्यावी असे गुलबर्गा संमेलनाचे समन्वयक कॉ. (प्रा.) तानाजी ठोंबरे व कॉ. अरुण कुमार रेणके यांनी कळविले आहे.

**– संपादक**

# भारतीय कम्युनिस्ट पक्षातर्फे मुलींना स्वसंरक्षणाचे धडे देणार!

## कॉ. अनिल चव्हाण

कोल्हापूरमध्ये कॉ. क्रांतिसिंह नाना पाटील रिंग रोडच्या दुतर्फा फुलेवाडी ते आपटे नगर या उपनगरांच्या दरम्यान धनगर समाजाच्या चार-पाच वस्त्या आहेत. गेल्या दहा-वीस वर्षांत शाहूवाडी आणि राधानगरी तालुक्याच्या दुर्गम भागातील नागरिक इथे रोजीरोटीसाठी येऊन राहिले आहेत.

पुरुष लोक दिवसभर माळी काम, झाडे तोडणे, नारळ काढणे, मोटारी इथे धुणे, भाजी विक्री असे व्यवसाय करतात तर महिला नागरी वस्तीमध्ये जाऊन धुणे भांडीची कामे मिळवतात. यातील काही घरांना अलीकडे लाईट, पाणी व कच्चे रस्ते मिळाले आहेत. लहान मुले शेजारच्या अनुदानित अथवा महापालिकेच्या मराठी शाळेमध्ये जातात. आर्थिक अडचण आणि अज्ञानी पालक अशा कारणांनी बरेच जण मध्येच शाळा सोडतात व पोटाच्या उद्योगाला लागतात. काही जणांनी शेळ्या किंवा म्हशीही सांभाळल्या आहेत.

पोटामागे दिवसभर धावणाऱ्या या वस्त्यांमध्ये यावर्षी मोठी खळबळ माजली. दोन तरुण मुलींनी आत्महत्या केल्या. जूनमध्ये पल्लवी बोडेकर तर फेब्रुवारीमध्ये गीता बोडेकर या तरुणींनी ओढणीने फास लावून घेतला. परिसरातील तरुणांच्या छेडछाडीला कंटाळून त्यांनी फास लावून घेतल्याचा जबाब घरच्यांनी दिला, तेव्हा पोलिसांनी काही तरुणांना अटक केली, त्यांच्यावर गुन्हा दाखल केला. हे तरुण शेजारीच राहणारे असून त्याच समाजाचे आहेत.

जून २०१६मध्ये पल्लवीने आत्महत्या केली तेव्हा भा.क.प.चे शहर सेक्रेटरी कॉ. अनिल चव्हाण, कॉ. सतीशचंद्र कांबळे, कॉ. बी. एल. बरगे, कॉ. स्नेहल कांबळे, कॉ. मीना चव्हाण, कॉ. रूपाली कदम, कॉ. सुनिता अमृतसागर, कॉ. मुकुंद कदम यांनी त्या भागात फिरून जागृती केली. गुंडांचा बंदोबस्त करावा म्हणून एस.पीं.ना शिष्टमंडळ भेटले. परिसरातील ७० महिला व मुलींनी शिष्टमंडळात सहभाग नोंदवला. त्यानंतर या ठिकाणी सामाजिक कार्यक्रम सुरू ठेवण्याचे ठरले, पण दोन दिवसांनी पुन्हा त्याच कुटुंबीयांना घेऊन काही प्रतिष्ठित नेत्यानी एस.पीं.ची भेट घेतली. त्यामुळे पुढे काही उपक्रम झाले नाहीत.

गीता बोडेकरने फेब्रुवारी २०१७ मध्ये आत्महत्या केली. तेव्हा पुन्हा वरील कार्यकर्त्यांनी मिटींग घेतली, एस.पीं.ना शिष्टमंडळ भेटले, व वस्तीमध्ये जाहीर शोकसभा घेतली. सभेला वस्तीतील शेकडो स्त्री, पुरुष व मुलींनी हजेरी लावली. सायं. ७ वाजता सुरू झालेली सभा दहा वाजेपर्यंत चालली. नागरिकांनी पूर्ण शांतता राखली. सभेमध्ये कॉ. अनिल चव्हाण, कॉ. बी. एल. बरगे, कॉ. सतीशचंद्र कांबळे, कॉ. स्नेहल कांबळे, कॉ. रूपाली कदम, प्रा. कॉ. सुनिता अमृतसागर, बाबूराव बोडके, आबाजी बोडेकर, बंडू बोडकर, मुख्या. सुरेश मेस्त्री, एन.जी. घोडके सर, राजेश वरक सर अशा अनेक वक्त्यांनी आपले विचार मांडले.

सभेमध्ये पुढील ठराव करण्यात आले: १) गुन्हेगारांना जास्तीत जास्त व कडक शिक्षा व्हावी. २) नागरिकांच्या तक्रारींची पोलिसांनी त्वरित नोंद घ्यावी व कार्यवाही करावी. ३) पुन्हा कोणी आत्महत्या करू नये म्हणून मुलींच्यासाठी स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण द्यावे. ४) मुलींची मानसिकता घडवण्यासाठी उपक्रम घ्यावेत. ५) निर्भया पथकाने वस्तीमध्ये फेरी मारावी.

त्यानंतर दोन दिवसांनी पोलीस अधिकाऱ्यांनी मंगल कार्यालयामध्ये तरुण-तरुणी व नागरिकांचा मेळावा घेतला. त्यामध्ये विश्वास नांगरे पाटील यांनी नागरिकांना धीर देतानाच १) गुन्हेगारांना जास्तीत जास्त शिक्षा व्हावी म्हणून सक्षम वकील नेमू, २) निर्भया पथकाचे कार्य सुरू आहे ते वाढवू ३) १२ वी पास मुलींच्यासाठी पोलीस भरती प्रशिक्षण वर्ग घेऊ. ४) मुलींच्यासाठी तीन दिवसांचे तायकवांडो- स्वसंरक्षण प्रशिक्षण देऊ इ. बाबी करण्याचे जाहीर केले.

काहीतरी मार्ग काढला पाहिजे हे या वस्त्यांना पटले आहे, पण त्या चाचपडत आहेत. काही जणांना आपला समाज म्हणत त्यांना बांधून ठेवण्याची इच्छा आहे. तर काही जणांना हे प्रसिद्धीचे साधन वाटते आहे. स्वयंसेवी संघटनांनी आपण नागरीक सुविधा, बालवाडी इ. साठी प्रयत्न करणार असल्याचे जाहीर केले आहे. ही घटना स्वयंसेवी संस्थेसाठी देणग्या आणि अनुदान मिळवण्याचेही साधन बनू शकते.

पण याच्या पलीकडे जाऊन प्रश्नाच्या मुळापर्यंत जाण्याची गरज आहे. दिवसभर कामात गुंतलेल्या पालकांच्या मुलांवर संस्कार कोण करणार? शाळा सोडण्याचे प्रमाण कमी कसे करणार? शेजारी सुरू असलेला दारूचा गुत्ता बंद कोण करणार! किशोरवयीन मुला-मुलींना सावध कसे करणार? आणि या सर्वांच्या मुळाशी असलेले दारिद्र्य नष्ट कसे करणार?

कम्युनिस्ट पक्षाच्या बैठकीत या प्रश्नांचा ऊहापोह झाला. यातील काही प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी वस्तीवाल्यांशी मिटींग सुरू आहेत.

❑

**(संपर्क : कॉ. अनिल चव्हाण – ९७६४१४७४८३)**

# बी.जी. कोळसे पाटील : कॉ. गोविंद पानसरे स्मृतीदिन
# ‘बहुजनांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी’

**अहमदनगर :** देशात बहुजनांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याची सातत्याने गळचेपी करण्यात आली आहे. खरा व वस्तुनिष्ठ इतिहास समाजासमोर कधीही मांडला जात नाही. कॉ. गोविंद पानसरे यांनी खरा इतिहास मांडायला सुरुवात केली त्यामुळेच त्यांची हत्या करण्यात आली. सत्य बोलणे हाही या देशात गुन्हा ठरत आहे, असे प्रतिपादन माजी न्यायमूर्ती बी.जी. कोळसे पाटील यांनी येथे केले.

कॉ. गोविंद पानसरे यांच्या द्वितीय स्मृतीदिनानिमित्त रावसाहेब पटवर्धन स्मारकात कोळसे पाटील यांचे ‘अभिव्यक्ती स्वातंत्र्यापुढील आव्हाने’ या विषयावर व्याख्यान झाले. आमदार संग्राम जगताप अध्यक्षस्थानी होते. कॉ. स्मिता पानसरे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. कोळसे पाटील म्हणाले, हजारो वर्षांपासून देशात अभिव्यक्ती स्वातंत्र्याची मुस्कटदाबी सुरू आहे. मोदींच्या राज्यात तर या मुस्कटदाबीने कळस गाठला आहे. शिवाजी महाराजांची लढाई ही कुठल्याही धर्माविरुद्ध नव्हती. ते मुस्लिमद्वेष्टे नव्हते. मात्र, इतिहासकारांनी तसे जनतेवर ठसविले. कॉ. पानसरे यांनी खरे शिवराय लोकांसमोर आणले पण बहुजनांनी या शिवरायांना समजूनच घेतले नाही. मुंबईवरील २६/११च्या हल्ल्यानंतर हेमंत करकरे या पोलीस अधिकाऱ्याची हत्या मुस्लीम दहशतवाद्यांनी केली, असे भासविले गेले. मात्र प्रत्यक्षात अत्यंत पद्धतशीरपणे कट करून हिंदुत्ववाद्यांनीच करकरे यांना संपविले आहे. हिंदू-मुस्लीम दंगे भडकविण्यासाठी काही हिंदू संघटनाच बॉम्बस्फोट घडवून आणतात हे करकरे यांनी शोधून काढले होते. त्यामुळेच त्यांचा खून केला गेला. मात्र पुराव्यांनिशी मांडणी करूनही सत्य दडपले जाते. करकरे यांना कोणी मारले? हा प्रश्न एस.एम. मुश्रीम या पोलीस अधिकाऱ्याने उपस्थित केला आहे. पानसरे यांनीही हा प्रश्न उचलताच त्यांची हत्या करण्यात आल्याचा आरोप कोळसे पाटील यांनी केला. जाती, धर्मात भांडणे लावण्यासाठी देशात सातत्याने षड्यंत्र खेळले गेले. आताही मराठा व मराठेतर हा वाद संघाने पेटविला असल्याचे ते म्हणाले.

माणसांची हत्या करून विचार संपविता येणार नाहीत, असे यावेळी जगताप म्हणाले. प्रारंभी कॉ. बन्सी सातपुते यांनी प्रास्ताविक केले. उद्धव काळापहाड यांनी सूत्रसंचालन केले. तर बहिरनाथ वाकळे यांनी आभार मानले. याप्रसंगी कॉ. सुभाष लांडे, ॲड. लक्ष्मण वाडेकर, निवृत्त प्राचार्य खासेराव शितोळे, शिवाजीराव देवढे, रंजना गवांदे, ॲड. सुभाष भोर, कॉ. महेबूब सय्यद, अर्शद शेख आदींची उपस्थिती होती.

# ‘मराठवाड्याच्या विकासासाठी वैचारिक उठाव हवा !’
## ॲड. भगवानराव देशपांडे यांचे प्रतिपादन :
## लातुरात कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांच्या हस्ते सन्मान

**लातूर :** सर्वांचेच लक्ष राजकारणाकडे असल्याने मराठवाड्याच्या अन्य क्षेत्रविकासाकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले, अशी खंत व्यक्त करीत या प्रांताच्या सर्वांगीण विकासासाठी वैचारिक उठाव व्हावा, अशी अपेक्षा डाव्या विचारसरणीचे खंदे पुरस्कर्ते ॲड. भगवानराव देशपांडे यांनी येथे व्यक्त केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने ॲड. भगवानराव देशपांडे यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केले आहे. त्यानिमित्त मराठवाडा जनता विकास परिषदेच्या लातूर जिल्हा शाखेच्यावतीने येथील डॉ. भालचंद्र रक्तपेढीच्या सभागृहात त्यांचा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

त्याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मराठवाडा जनता विकास परिषदेचे अध्यक्ष शिवाजीराव नरहरे हे होते. उषाताई देशपांडे, जयप्रकाश दगडे यांची उपस्थिती होती. ॲड. देशपांडे म्हणाले की, जनतेच्या उठावामुळे पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात प्रगती झाली. मराठवाड्याला सुदैवाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अशी दोन विद्यापीठे लाभली आहेत. या विद्यापीठांच्या माध्यमातून आपणाला बरीच प्रगती साधता येऊ शकते. त्यासाठी जनतेचा रेटा गरजेचा आहे, महापुरुषांचे कार्य नव्या पिढीसमोर ठेवण्याची गरज आहे. ध्येयवादाची, विचाराची ठिणगी निर्माण केली नाही तर कार्यकर्ते मरगळलेलेच राहणार याकडे त्यांनी लक्ष वेधले. कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाला ‘अ’ दर्जा मिळाला आहे. असा ‘अ’ दर्जा मिळवणारे हे देशातील पहिले विद्यापीठ आहे. हे सर्व सर्वांच्या सहकार्यातून घडले. मराठवाड्याचा विकास साधण्यासाठी मानसिकता बदलून आपणाला पुढे यावे लागेल. आम्ही इतरांपेक्षा कोठेही कमी नाही. आपणही स्पर्धा करू शकतो, यासाठी आपण आपल्या ताकदीचा पूर्णपणे वापर करण्याची गरज आहे, असे सांगितले.

# ग्रा. पं. कर्मचाऱ्यांचे यशस्वी उपोषण

**जळगाव :** रावेर तालुक्यातील सुनोदा आंदलवाडी, दसनूर निबोल ग्रा.पं.च्या शिपाई, पा. पु. सफाई कर्मचाऱ्यांनी किमान वेतन मिळावे, थकीत पगार मिळावा, प्रॉव्हीडंट फंडाचा हिशोब द्यावा म्हणून ६ मार्च ते ७ मार्च काळात दोन दिवस उपोषण पंचायत समिती रावेरसमोर केले. पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, सहाय्यक गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी ही यंत्रणा जागी झाली. त्यांनी त्या त्या गावाच्या ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी ह्यांना धारेवर धरून पगारवाढ, थकीत पगाराचे अनुदान, प्रॉ. फंड खाते उघडण्याच्या प्रश्नांचा निपटारा करण्याचे लेखी पत्र व ग्रामसेवक /सरपंचांची पत्रेही संघटनेला दिली.

उपोषणार्थी सुनिता कंडारे, पांडुरंग कंडारे (दसनूर), सुनिता हंसकर, सुभाष हंसकर (निंबोल), चेतन आदीवाल, भावलाल चौधरी (सुनोदा) ह्यांनी गटविकास अधिकारी सोनिया नाकोडे ह्यांच्या हस्ते रसपान करून उपोषण सोडले.

# ग्रा. पं. कर्मचाऱ्यांचा मोटर सायकलीवरून धडक मोर्चा !

**जळगाव :** तालुका ग्रा.पं. कर्मचारी महासंघातर्फे कर्मचाऱ्यांचे पगाराचे अनुदान खाती जमा करा या मूळ मागणीसह लाल बावटा ऑफीस जळगाव ते पंचायत समिती जळगाव कार्यालयापर्यंत २० मोटर सायकलींवर ३०-३४ कर्मचाऱ्यांनी आयटकचे झेंडे हाती घेऊन धडक मोर्चा काढला.

गटविकास अधिकारी एस. बां. सोनवणे, विस्तार अधिकारी ढाके व वाघ ह्यांनी चर्चा केली. तालुका पदाधिकारी राजू कोळी, यशवंत साळुंके, पांडू कोळी, मुरलीधर जाधव, गोकुळ पाटील, हिंमत पाटील आदींचा त्यात सहभाग होता. (कर्मचाऱ्यांना वेतनाच्या, अनुदानाची रक्कम पदरी पडली आहे.)

ही आंदोलने युनियनचे जिल्हाध्यक्ष कॉ. अमृत महाजन ह्यांच्या नेतृत्वाखाली झाली.

# अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे धरणे यशस्वी !

**जळगाव :** जिल्हा अंगणवाडी-बालवाडी कर्मचारी युनियन आयटकतर्फे जळगाव जिल्हा परिषदेवर २ मार्च रोजी फेब्रुवारी अखेर थकीत मानधन मिळावे, बचत गटांची बिले, थकबाक्या द्या, खाऊचे दर वाढवा, सेवानिवृत्तीचे प्रस्ताव पाठवा, थकीत बिले द्या, फडणवीस सरकारने सर्व युनियनच्या दिलेल्या प्रस्तावाप्रमाणे हंगामी पगार वाढ द्यावी आदी मागण्यांसाठी जोरदार धरणे आंदोलन करण्यात आले.

धरणे आंदोलनात शशिकला निंबाळकर, प्रेमलता पाटील, सुनंदा नार्यड, आशा निकम, मिना काटोले, हिरा महाले, जिजाबाई राणे, ठगूबाई भोई, सुनंदा पाटील, गुक्तारा तडबा, सुरेखा तळे, फरीनबी आदी उपस्थित होते.

## कॉ. प्रा. जे. एफ. पाटील आणि साथी सुनिल शिंदे यांचे मनःपूर्वक धन्यवाद!

कॉ. गोविंद पानसरे स्मृती ट्रस्टसाठी आर्थिक मदत पाठविण्याचे आवाहन 'युगांतर' व इतरही मासिकांतून सातत्याने केले जात होते.

कॉ. प्रा. जे. एफ. पाटील यांनी रु. १०००/- व साथी सुनिल शिंदे यांनी रु. १०००/- या ट्रस्टसाठी पाठवले आहेत. दोघांचेही मन:पूर्वक धन्यवाद मानतो.

**— कॉ. डॉ. भालचंद्र कानगो**

## महत्त्वाचे निवेदन

भारतीय कम्युनिस्ट पक्षाने हल्लीच www.cpimedia.org या नावाने आपले संकेतस्थळ (website) सुरू केले आहे. या संकेतस्थळावरील माहिती अधिकाधिक परिपूर्ण व्हावी यासाठी आपणाकडे असलेली पक्षाच्या धोरणांविषयीची जुनी कागदपत्रे, छायाचित्रे पुढील पत्त्यावर पाठवावीत. भारतीय कम्युनिस्ट पक्ष कार्यालय, राजभुवन, ३१४, सरदार पटेल रोड, मुंबई- ४.

**— संपादक मंडळ**

# भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा झेंडा जाळणाऱ्या हिंदू रक्षा मंचच्या विरुद्ध पोलिसांनी कारवाई न केल्यास आंदोलन तीव्र करण्याचा भाकप नेत्यांचा इशारा

**भंडारा :** भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा झेंडा जाळणाऱ्या हिंदू रक्षा मंच, भंडाराच्या विरुद्ध पोलिसांनी कारवाई न केल्यास भाकप भंडाऱ्यातच नव्हे तर जिल्ह्यात, राज्यात आणि देशात तीव्र आंदोलन करेल असा इशारा भाकपचे ज्येष्ठ नेते कॉ. मनोहर देशकर, नागपूर यांनी दिला. आणि पक्षाचा झेंडा जाळणाऱ्या हिंदू रक्षा मंचचा जाहीर निषेध केला.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने दि. ९ मार्च २०१७ रोजी दु. २.३० वाजता सार्वजनिक वाचनालयासमोर गांधी चौक भंडारा येथे भाकपचा झेंडा जाळणाऱ्या हिंदू रक्षा मंच व तत्सम प्रवृत्तीच्या निषेधार्थ धरणे आंदोलन व निषेध सभेचे आयोजन करण्यात आले होते.

सभेच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कम्युनिस्ट महिला नेत्या कॉ. शांताबाई बावनकर, तुमसर ह्या होत्या, तर भाकपचे राज्य सचिव मंडळ सदस्य कॉ. शिवकुमार गणवीर, किसान सभेचे सचिव कॉ. माधवराव बांते व जिल्हा सचिव कॉ. हिवराज उके यांचे मार्गदर्शन झाले.

या प्रसंगी बोलताना कॉ. गणवीर यांनी सांगितले, की एल.डी.एफ.च्या केरळ सरकारमध्ये माकपबरोबर भाकप सरकारमध्ये आहे. त्या केरळमध्ये आर.एस.एस. वाले वाद निर्माण करतात आणि त्यांच्या विरोधात बोलणाऱ्यांना ते आणि त्यांच्या संघटना शिरच्छेद करण्याची, बलात्काराची, देशद्रोही ठरवण्याची धमकी देतात.

सर्वप्रथम कॉ. हिवराज उके यांनी प्रास्ताविक भाषणात सांगितले की, दि. २ मार्चला आम्ही झोपडपट्टी धारकांना पट्टे मिळाले पाहिजे म्हणून कलेक्टर कचेरीसमोर धरणे आंदोलन केले. आंदोलन संपल्यानंतर मंडप व मंडपाला लागलेले झेंडे सोडण्याचे काम सुरू होते.

त्यानंतर सुमारे ३ ते ३.३०च्या सुमारास केरळ सरकारच्या विरुद्ध हिंदू रक्षा मंच, भंडाराच्या लोकांनी त्याच ठिकाणी निषेध आंदोलन केले व त्याच ठिकाणी असलेले भाकपचे झेंडे जाळून केरळ सरकारचा निषेध केला.

हिंदू रक्षा मंचने केरळ सरकारचा निषेध केला त्याला आमचा विरोध नाही. तर त्यांनी आमच्या भाकपचा झेंडा जाळला याचा निषेध केला व वृत्तपत्रात भाकपचा झेंडा जाळून निषेध केला असे जाहीर केले त्या कृत्याचा भाकपच्या वतीने निषेध व्यक्त करण्यात आला. आणि दि. ४ मार्चला या घटनेची पोलीस स्टेशन भंडारा येथे तक्रार करण्यात आाली असून अजूनपर्यंत काय कारवाई झाली हे कळले नसल्याने येत्या १५ तारखेपर्यंत योग्य कारवाई करून पक्षाला तसे कळविण्यात यावे; अन्यथा १५ मार्चला जिल्हा सचिव मंडळाच्या सभेत जिल्हाव्यापी आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात येईल असेही भाकप नेत्यांनी आवाहन केल्याचे कॉ. हिवराज उके यांनी सांगितले.

सभेत उपस्थित कार्यकर्त्यांमध्ये प्रामुख्याने कॉ. माणिकराव कुकडकर, कॉ. झुलनबाई नंदागवळी, कॉ. गजानन पाचे, कॉ. वामनराव चांदेवार, कॉ. रत्नाकर मारवाडे, कॉ. योगराज ताईतकर, कॉ. मंगेश माटे, कॉ. अमित क्षीरसागर, कॉ. जयप्रकाश मसरके, कॉ. अप्तदिप रामटेके, कॉ. गोपाल वैदय, कॉ. अंजिरा उके, कॉ. समता उके, कॉ. गौतम भोयर, कॉ. रमेश पंधरे, कॉ. आसाराम वैद्य, कॉ. चेतना उके, कॉ. राजू लांजेवार, कॉ. बैसाखू साहू आदींचा समावेश होता.

# धनवाडी-कठोरा ग्रामस्थांच्या उपोषणानंतर कामाला सुरुवात!

**चोपडा :** तालुक्यातील धनवाडी-कठोरा सनपूले रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली होती. गेली कित्येक वर्षे तो रस्ता वाईट अवस्थेत होता. रस्त्याने जाताना काही पेशंट रस्त्यातच दगावले. गरोदर मातांच्या डिलेव्हरीच्या घटनाही घडल्या. या प्रश्नाला भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे वयोवृद्ध कार्यकर्ते कॉ. शिवाजी वामन पाटीलसह संस्था संचालक कठोरा ह्यांच्या उपोषणाने वाचा फोडली. कठोरा गावाचे सरपंच कल्पना पाटील, भरत पाटील, धनवाडीचे सरपंच, कॉ. ताराबाई पाटील, कॉ. शांताराम पाटील (उपसरपंच), सनुपूले पंचायतीचे सरपंच प्रेमलाल पाटील, भा.क.प.चे कार्यकर्ते छोटू पाटील, डॉ. पंकज पाटील, डॉ. विलास पवार, संतोष कुंभार, संदीप धनगर, मुकेश कोळी, भाऊसाहेब धनगर आणि विद्यार्थ्यांनी एकत्रित आयटक ऑफीस इथून कचेरीवर प्रचंड मोर्चा काढला. चोपडा तहसीलदार श्री. गिरासे यांनी प्रधानमंत्री सडक योजनेचे जि.प. अधिकारी ह्यांच्याशी संपर्क साधून रस्त्याची पाहणी केली. १५ दिवसांत रस्ता वापरायोग्य करण्याचे लेखी आश्वासन दिल्याने दि. २ जाने. १७ पासून सुरू असलेले उपोषण कॉ. शिवाजी पाटील यांनी मागे घेतले. रस्त्याचे काम आता जोरात सुरू आहे. नायब तहसीलदार अधिकार पेंढारकर ह्यांनी या प्रकरणी परिश्रम घेतले.

# ''डाव्या आणि पुरोगाम्यांनी एकत्र येणे आवश्यक'' – भाई वैद्य !

**गारगोटी :** जगाचा घास घेणारी जागतिक व्यवस्था विरोधात आहे, देशातील आणि जगातील संपत्ती माणुसकीहिन वित्तीय भांडवलदारांच्या हातात एकवटत आहे; वर्णव्यवस्था समर्थक धर्मांध शक्ती सत्तेवर आहेत, अशा वेळी डावे आणि पुरोगामी विखुरलेले आहेत. ते एकेकटे मुकाबला करू शकत नाहीत, म्हणून त्यांनी एकत्र येणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजवादी विचारवंत भाई वैद्य यांनी केले. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे भुदरगड तालुक्याचे नेते कॉ. दत्ता मोरे यांना गडहिंग्लजच्या गोविंद पानसरे अकादमीने कॉ. गोविंद पानसरे स्मृती पुरस्कार प्रदान केला त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कॉम्रेड बाबूराम निंबाळकर होते. म. गांधींना मानणाऱ्या जमनालाल बजाज यांचा नातू राहुल कुमार बजाज याने केवळ जास्त नफ्यासाठी पाच हजार कामगारांना रस्त्यावर फेकून पुण्याचा स्कूटरचा कारखाना बंद केला. जगभर असे घडत आहे, कामगारांचे मोर्चे निघत आहेत, असे कॉ. दत्ता मोरे यांनी म्हटले.

प्रास्तविकामध्ये सुभाष धुमे यांनी शहीद कॉ. पानसरेंच्या मार्गदर्शनाखाली सुरू केलेल्या शाहू व्याख्यानमालेचा व त्यातून उभ्या राहिलेल्या पानसरे अकादमीच्या कार्याचा आढावा घेतला. गेल्या वर्षी कॉ. पानसरे स्मृती पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांना दिला होता, तोही भाई वैद्य यांच्याच हस्ते, याची त्यांनी आठवण करून दिली.

अध्यक्षीय भाषणामध्ये नाकवाडीचे ज्येष्ठ कॉम्रेड बाबूराव जिजासौ निंबाळकर यांनी कॉ. दत्ता मोरेंच्या कार्याचा गौरव केला.

सत्कार सोहळ्यासाठी कोल्हापूरहून कॉ. उमा पानसरे, कॉ. बी. एल. बरगे, कॉ. अनिल चव्हाण, कॉ. स्नेहल कांबळे, कॉ. सतीशचंद्र कांबळे उपस्थित राहिले आणि त्यांनी कॉ. उमा पानसरे यांच्या हस्ते पक्षातर्फे अभिनंदन पत्र दिले.

या नेटक्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाहू वाचनालयाचे कार्यवाह जी. डी. पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन आनंद पाटील यांनी केले. मानपत्राचे वाचन प्रा. डॉ. मंजुषा माळी यांनी केले. शिक्षणशास्त्र विषयात पी.एचडी. केल्याबद्दल त्यांचा या वेळी पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमासाठी गारगोटी आणि परिसरातील विविध राजकीय व सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते, नेते व नागरिकांनी शाहू वाचनालयाचे जे. पी. नाईक सभागृह तुडुंब भरले होते.

# भाकपतर्फे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**नाशिक :** ॲड. कॉ. गोविंद पानसरे यांच्या खुनाला दोन वर्ष पूर्ण होत आहेत. ज्येष्ठ नेते कॉ. गोविंद पानसे यांच्या हत्येत सहभागी असणाऱ्या सनातनच्या कार्यकर्त्यांना फरारी घोषित करा, पानसरे यांच्या हत्येचा तपास करण्यासाठी विशेष पोलीस पथक नियुक्त करावे, संशयित आरोपींचे वकील साक्षीदारांना धमकी देत आहेत अशांबाबत पोलिसांत तक्रार देऊनही त्यांची चौकशी होत नाही, हे दुर्दैवी आहे. कॉ. पानसरे यांच्या मारेकऱ्यांना तत्काळ अटक करा अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्ष व आयटक कामगार संघटनेच्या वतीने करण्यात आली.

# सावित्रीबाई फुलेंचे क्रांतिकारी विचार अमलात आणा

## कॉ. राणा भवन येथे अभिवादन सभा

**भंडारा :** क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे क्रांतिकारी विचार अमलात आणण्याचा किमान प्रयत्न केला तरच त्यांचा स्मृती दिवस साजरा करण्याचा आपणास नैतिक अधिकार आहे अन्यथा ती नुसती औपचारिकता ठरले असे प्रतिपादन भाकपचे जिल्हा सचिव कॉ. हिवराज उके यांनी केले.

१० मार्चला दु. १२ वा. भाकप कार्यालय, कॉ. राणा भवन, भंडारा येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १२०व्या स्मृती दिनानिमित्त अभिवादन सभेचे आयोजन केले होते.

अध्यक्षस्थानी महिला फेडरेशनच्या कार्यकर्त्या कॉ. ममता तुरकर होत्या. या प्रसंगी कॉ. रत्ना इलमे, कॉ. हिवराज उके व कॉ. सदानंद इलमे यांचे मार्गदर्शन झाले.

सर्वप्रथम क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.

संचालन कॉ. चेतना उके यांनी केले. या प्रसंगी प्रामुख्याने कॉ. श्रीवंता अंबुले, कु. समता उके, गौतम भोयर, जे. के. अंबुले, दिलीप श्रीसागर इ. उपस्थित होते.

# कोल्हापूर येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन

कोल्हापूर येथे भारतीय कम्युनिस्ट पक्षासह विविध जनसंघटना व परिवर्तनवादी पक्ष व संस्था, संघटनांच्यावतीने ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या द्वितीय स्मृतीदिनानिमित्त कोल्हापूरात १६ ते २० फेब्रुवारी दरम्यान विविध उपक्रम राबिवण्यात आले. यावेळी मॉर्निंग वॉक, कॉम्रेड पानसरे यांच्या मारेकऱ्यांना ताबडतोब अटक करा या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा यांसह परिसंवाद आणि जाहीर स्मृतीजागर सभा असे उपक्रम राबवून कॉम्रेड पानसरे यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले आणि कॉम्रेड पानसरे यांच्या विचारांची चळवळ पुढे नेण्याचा संकल्प करण्यात आला.

**१६ फेब्रुवारी : शिवाजी विद्यापीठात परिसंवाद**

सत्तेशिवाय विकास ही संकल्पना फसवी आहे. समाजकारणाबरोबर राजकारण केलेच पाहिजे. सध्या राजकारणाचे विकृतीकरण करून लोकशाही संपवण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यासाठी राजकारणापासून दूर न राहता राजकारणाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याची गरज असल्याचे प्रतिपादन भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सरचिटणीस व राजकीय विश्लेषक डॉ. भालचंद्र कानगो यांनी केले. मराठी भाषा विभाग, राज्यशास्त्र विभाग व श्रमिक प्रतिष्ठानतर्फे कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या द्वितीय स्मृतीदिनानिमित्त आयोजित परिसंवादाच्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठात कार्यक्रम झाला. 'जागतिकीकरणाचे बदलते स्वरूप आणि आपण' या विषयावरील परिसंवादात कानगो यांनी 'आंतरराष्ट्रीय अर्थ-राजकारणाचे बदलते स्वरूप' यावर मते मांडली.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत समूह केंद्रित भांडवलशाही गतीने पुढे जात आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनता कोंडीत सापडली आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या या धोरणामुळे पुन्हा एकदा भांडवलदारांचा वर्चस्ववाद वाढण्याचा धोका आहे. या पार्श्वभूमीवर मानवकेंद्रित राष्ट्रवादाची नव्याने उभारणी करणे काळाची गरज आहे, असा उल्लेख करून डॉ. कानगो म्हणाले, समता हे मूल्य भारतात श्रेष्ठ समजले जाते. प्रत्यक्षात मात्र वर्चस्ववादाचे श्रेष्ठत्व वाढत आहे. नवभांडवलशाहीची खाबुगिरी, तंत्रज्ञानातील वाढते बदल याला पर्याय म्हणून पंडित नेहरूंच्या काळातला सर्वसमावेशक राष्ट्रवाद आज आवश्यक आहे.

'जागतिकीकरणातील अंतर्विरोध : धोके आणि संधी' या विषयावर मुंबईतील प्रा. संजीव चांदोरकर म्हणाले, तीन दशकांनंतर आजची स्थिती भयावह आहे. दारिद्र्यातून विषमता आणि अस्थैर्य स्पष्टपणे दिसत आहे. दुसऱ्या सत्रात 'भारतातील नवफॅसिझमचे स्वरूप' या विषयावर डॉ. माया परिमल यांनी मार्गदर्शन केले. 'महाष्ट्रातील अस्मितांचे राजकारण आणि पुरोगामी पक्षांची भावी दिशा' या विषयावर संवादाचा समारोप झाला. यावेळी मराठी विभागप्रमुख डॉ. राजन गवस, प्रा. संजीव चांदोरकर, रघुनाथ ढमाले, सुधाकर मानकर, प्रकाश पवार, डॉ. मेघा पानसरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

**१८ फेब्रुवारी : जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा**

पानसरे हत्येच्या तपासात दिरंगाई होत असल्याच्या निषेधार्थ कॉ. गोविंद पानसरे समता संघर्ष समितीच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मार्चा काढण्यात आला. या मोर्चात महिलांची संख्या लक्षणीय होती. समितीच्यावतीने जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी यांना निवेदन देण्यात आले. आम्ही संयम ठेवून लोकशाही मार्गाने आंदोलन करत आहोत. पण राज्य सरकारने आता आमच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये, असा इशारा डाव्या चळवळीतील कार्यकर्त्यांनी यावेळी राज्य सरकारला दिला.

**२० फेब्रुवारी : मॉर्निंग वॉक**

कॉ. पानसरे यांच्या घरापासून सकाळी ८ वाजता मॉर्निंग वॉकला प्रारंभ झाला. यामध्ये ज्येष्ठ नेते प्रा. एन. डी. पाटील, कॉम्रेड उमा पानसरे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले. मॉर्निंग वॉक फेरी बिंदू चौकात आल्यानंतर सभा घेण्यात आली. यावेळी बोलताना प्रा. एन. डी. पाटील म्हणाले की, कॉ. पानसरे यांच्या हत्येला २ वर्षे झाली. या हत्याप्रकरणातील मारेकऱ्यांना सरकारने शोधावे यासाठी २ वर्षे रस्त्यावरील लढाई सुरू आहे. पण आता राज्य सरकारवर अवलंबून चालणार नाही. रस्त्यावरील लढाई बळकट करावयास हवी. ज्यावेळी रस्त्यावरील लोकांची संख्या वाढेल, त्यावेळी राज्यकर्त्यांच्या खुर्चीला हादरे बसल्याशिवाय राहणार नाहीत, असे मत त्यांनी व्यक्त केले.

**साहित्यिकांचे विचार देशभर पोहचविण्यासाठी जनआंदोलन : प्रलेस**

डॉ. नरेंद्र दाभोलकर, कॉम्रेड पानसरे आणि डॉ. एम. एम. कलबुर्गी या तीन विवेकी विचारवंतांच्या कर्मभूमीत जाऊन तेथील लोकांशी थेट संवाद साधण्यासाठी मध्यप्रदेशातील प्रगतिशील लेखक संघाने अभियान सुरू केले आहे. या



अभियानांतर्गत सर्व लेखकांनी कोल्हापूरातील पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी बोलताना प्रगतिशील लेखक संघाच्या मध्यप्रदेश शाखेचे महासचिव विनीत तिवारी म्हणाले, की डॉ. नरेंद्र दाभोलकर, कॉम्रेड पानसरे आणि डॉ. एम. एम. कलबुर्गी या साहित्यिकांचे विचार सभा, लघुपट या माध्यमांद्वारे समाज घटकांपर्यंत पोहचविण्यासाठी, साहित्यिकांना याच्याशी जोडून घेऊन देशभर मोठे जनआंदोलन उभे करण्यात येणार आहे.

**निखिल वागळे व प्रा. गणेश देवी यांच्या उपस्थितीत जाहीर स्मृती जागर सभा**

श्रमिक प्रतिष्ठानच्यावतीने २० फेब्रुवारी रोजी शाहू स्मारक भवन येथे स्मृती जागर सभा घेण्यात आली. 'असहिष्णुतेचे राजकारण' या विषयावर बोलताना पत्रकार निखिल वागळे म्हणाले की, पुरोगामी व परिवर्तनाचे विचार मांडणाऱ्यांना संपविण्याचे काम सुरू असतानाच सत्ताधाऱ्यांचे राज्यघटनेवर नव्हे तर धर्मावर आधारित देश निर्माण करण्याचे षड्यंत्र सुरू आहे. या साऱ्या खून प्रकरणात सातत्याने संशयाच्या घेऱ्यात असणाऱ्या सनातनसारख्या संस्थांवर कडक कारवाई व्हावी, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली. यप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. गणेश देवी, डॉ. हमीद दाभोलकर, प्रा. मेघा पानसरे, कॉम्रेड दिलीप पवार यांचीही भाषणे झाली.

(वृत्तसंकलन : कॉ. सुशील लाड)

## कॉ. गोविंद पानसरे स्मृतिकोषाला भरीव अर्थसाह्य करा!

कॉ. गोविंद पानसरे यांच्यावर कोल्हापूर येथे दि. १६ फेब्रुवारी २०१५ रोजी धर्मांध शक्तींनी हल्ला केला. त्यात उमा पानसरे याही जखमी झाल्या व २० फेब्रुवारी २०१५ रोजी पानसरे यांचे निधन झाले.

आयुष्यभर कॉ. पानसरे यांनी नैतिकता व उच्च भारतीय सांस्कृतिक मूल्ये जपून जगण्याचा प्रयत्न केला. भारतीय संस्कृतीत टिकाऊ काय व टाकाऊ काय याचा सतत अभ्यास व विचार, मंथन करून ते मांडण्याचे काम कॉ. गोविंद पानसरे करीत होते. या प्रयत्नांतूनच त्यांनी लोकवाङ्मय गृहाचे संचालक व श्रमिक प्रतिष्ठान कोल्हापूरचे प्रमुख म्हणून सतत सकस साहित्य निर्मिती केली. विठ्ठल रामजी शिंदे, म. ज्योतिबा फुले, डॉ. भीमराव आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज व इतर समाजसुधारकांचे विचार जनतेपुढे ठेवले.

छत्रपती शिवाजी महाराजांचे खरे कार्य व प्रतिमा प्रभावीपणे 'रयतेचा राजा' म्हणून पुढे आणण्याचे ऐतिहासिक काम त्यांच्या 'शिवाजी कोण होता' या ८८ पानी छोट्या पुस्तिकेने व त्या संदर्भात त्यांनी संपूर्ण राज्यभर दिलेल्या भाषणांनी केले आहे. समाजातील महत्त्वाच्या प्रश्नांवर सतत व्याख्याने देणे, छोट्या पुस्तिका लिहून जनजागृती करणे असे महत्त्वाचे कार्य त्यांनी सातत्याने केले. या कार्यातूनच 'मुस्लिमांचे लाड?', 'मंडल आयोग व राखीव जागा', 'छत्रपती शाहू : वसा व वारसा', 'मार्क्सवादाची तोंडओळख', 'सच्चर कमिटीचा अहवाल', 'रुपयाचे अवमूल्यन', 'जात-धर्म व समाज' अशा अनेक पुस्तिका त्यांनी काढल्या व त्यामुळे समाज ढवळून निघाला. फक्त विचार मांडणे, प्रबोधन करणे एवढ्यापुरतेच मर्यादित न राहता त्यांनी मोलकरीण संघटना, फेरीवाल्यांची संघटना, कोल्हापूर येथील गोकुळ कामगार संघटना, सहकारी बँक कामगारांच्या व औद्योगिक कामगारांच्या संघटना बांधल्या. 'कामगार कायद्याची तोंडओळख' हे त्यांचे पुस्तक असंख्य कामगार कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करते आहे.

याचबरोबर कोल्हापूरात तसेच राज्यभरात येथे अनेक समाजसुधारणांना वेग देणाऱ्या कार्यात व आंदोलनांत त्यांनी पुढाकार घेतला. कोल्हापूरमधील अन्नधान्याची नासाडी व अंधश्रद्धांना बळ देणाऱ्या यज्ञाला यशस्वी विरोध केला. देवदासी प्रथेच्या विरोधी काम केले. आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहांना प्रोत्साहन देण्यासाठीही कार्य केले. या कामांत त्यांना प्रचंड विरोधही झाला, परंतु त्याची पर्वा त्यांनी केली नाही. कोल्हापूरमधील टोल आंदोलन, पाणी आंदोलन यांत त्यांचा पुढाकार सर्वज्ञात आहे.

लोक चळवळ पुढे नेण्यासाठी त्यांनी दरवर्षी १० दिवस राज्यातील विद्यार्थी-युवकांची कार्यशाळा घेण्यात पुढाकार घेतला. कॉ. अण्णा भाऊ साठे साहित्य संमेलन दरवर्षी भरवून यशस्वी केले. तसेच पुरोगामी विचार, धर्मनिरपेक्षता व समाजवाद मजबूत करण्यासाठी व्यापक प्रबोधनाचे काम केले. हे त्यांचे कार्य पुढे चालू ठेवण्याचे आव्हान आमच्यापुढे आहे व त्यासाठी आम्ही 'कॉ. गोविंद पानसरे स्मृतिकोष' निर्माण करण्याचा संकल्प केला आहे. या कार्यासाठी आपण भरीव साह्य करावे असे आवाहन आम्ही करीत आहोत. आपण आपली मदत 'कॉ. गोविंद पानसरे स्मृति ट्रस्ट' या नावाने धनादेश देऊन द्यावी ही विनंती.

**कॉ. गोविंद पानसरे स्मृती ट्रस्ट, बँक ऑफ महाराष्ट्र, A/c no. 60248733405, IFSC code : MAHB0000067.**

**- कॉ. भालचंद्र कानगो**

# समृद्धी महामार्ग कोणासाठी? समृद्धी कोणाची?
# औरंगाबादच्या जनजागरण यात्रेस चांगला प्रतिसाद

**औरंगाबाद :** भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या राज्य कार्यकारिणीच्या २६ फेब्रुवारीच्या बैठकीतील निर्णयानुसार समृद्धी महामार्ग कोणासाठी? समृद्धी कोणाची? असे प्रश्न उपस्थित करून ३ ते ६ मार्च दरम्यान जी जनजागरण व शोध यात्रा आयोजिण्यात आली होती त्यास औरंगाबादमध्ये चांगला प्रतिसाद मिळाला.

नागपूर ते मुंबई या प्रस्तावित महामार्गास समृद्धी असे गोंडस नाव देण्यात आल्यामुळे समृद्धी नेमकी कोणाची? हा प्रश्न यानिमित्ताने ठिकठिकाणच्या सभा बैठकांमध्ये उपस्थित करण्यात आला. महाराष्ट्रातील ज्या १० जिल्ह्यांतून हा महामार्ग चाललाय त्यामध्ये मराठवाड्यातील जालना व औरंगाबाद या दोन जिल्ह्यांचाही समावेश आहे.

मुंबई येथे २६ फेब्रुवारीच्या बैठकीत ठरल्यानुसार त्याची आखणी २८ फेब्रुवारी रोजी तातडीने घेण्यात आलेल्या औरंगाबाद जिल्हा कौन्सिलच्या बैठकीत करण्यात आली. २ मार्च रोजी डॉ. भालचंद्र कानगोंच्या उपस्थितीत पत्रकार परिषद घेऊन यात्रेचा हेतू व भाकप, किसान सभा, लालबावटा शेतमजूर युनियनची भूमिकाही जाहीर करण्यात आली. पत्रकार परिषदेस औरंगाबादच्या वर्तमानपत्रांनी ठळक प्रसिद्धी दिली. नियोजनानुसार ३ मार्च रोजी सकाळी जळगाव फेरण या औरंगाबाद तालुक्यातील पूर्वेकडील गावापासून यात्रेस प्रारंभ झाला. लाऊड स्पीकर, बॅनर, झेंड्यासह यात्रेची जीप सजवण्यात आली होती. तसेच या महामार्गाची माहिती व बाधित गावातील शेतकऱ्यांवर व शेतीवर होणारे परिणाम, शेतकऱ्यांवर होणारा अन्याय इत्यादींचा उल्लेख असणारी सुमारे ५ हजार पत्रकेही या वाहनात ठेवण्यात आली होती. नागपूरहून सुरू होणारा हा मार्ग जालना जिल्ह्यातील बदनापूर नंतर औरंगाबाद तालुक्यातून ज्या गावापासून सुरू होतो त्या करमाडच्या उत्तरेस असलेल्या जळगाव फेरणपासून ही यात्रा सुरू झाली. जळगाव फेरण येथील ग्रामपंचायतीसमोर झालेल्या बैठकीत सरपंच संजय हिवराळे, कारभारी ढवणे, गोविंद मेहर, भाऊसाहेब शेंडे, रामभाऊ कोळसे, रामू गवळी, राजेंद्र ठोंबरे, कल्याण भावली, बेडवाल आदींसह अनेक शेतकरी उपस्थित होते. या महामार्गामुळे आमचे उदरनिर्वाहाचे साधन हिसकावून घेतले जात असल्याची खंत यावेळी सर्वांनी व्यक्त केली. महामार्गासाठी जमीन न देण्याचा ग्रामसभेचा ठराव झाल्याचीही माहिती यावेळी शेतकऱ्यांनी दिली. काही जण किसान सभेचे सभासदही झाले. जळगाव फेरण नंतर कोलेवाडी, भांबर्डा, दुधड, करंजगाव आदी गावे करीत ही यात्रा दुपारनंतर जयपूर या गावी पोहचली. जयपूर गाव हे बहुसंख्येने मते आडनाव असणाऱ्यांचे गाव. आबासाहेब सर्जेराव मते या शेतकऱ्याने यात्रेकरूंना चहापाण्यासाठी घरी नेले व चहा होईपर्यंत आपली व्यथा सांगितली! त्यांची १२ एकर बागायत जमीन उद्‌ध्वस्त होत असल्याची खंत त्यांनी बोलून दाखवली. डाळींबाच्या बागेत ३५०० झाडे असून या बागेत त्यांनी नुकतेच दीड कोटीचे घर बांधले आहे. उत्पन्न चांगले. डाळींबाची बाग, घर सर्व काही उद्‌ध्वस्त होणार असल्यामुळे ते हवालदिल झाले आहेत. गेल्या काही दिवसांपासून ते मळ्याकडे फिरकलेही नाहीत. पंचायत समिती सदस्य व काँग्रेसचे कार्यकर्ते गजानन नारायण मते यांचीही ८ एकर जमीन या महामार्गात जाणार असल्याचे समजले. त्यांचे वडील नारायण हे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य आहेत. नंतर ही यात्रा शेंद्राबन येथे आली. एका अंगणवाडी ताईचे पती व स्वत: शेतकरी असलेले कॉ. मुरली म्हस्के यांच्या साडूंच्या घरी (श्री. साहेबराव तुपे पाटील यांचे घरी) जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. बाजरीच्या भाकरी, पिठले व ठेच्यावर ताव मारून काहीसे सुस्तावलेले यात्रेकरू पळशीशहर या गावाकडे रवाना झाले. दुपारी अडीच वाजेपासून पळशी शहर या गावातील शेतकरी यात्रेच्या स्वागतासाठी जमलेले होते. परंतु संध्याकाळी ५ वाजेच्या सुमारास यात्रा तेथे पोहचली. पांगलेल्या गावकऱ्यांना पुन्हा निरोप देऊन ग्रामपंचायत सभागृहात बोलवण्यात आले. कृती समितीच्या माध्यमाने येथे पूर्वीपासून कार्यरत असलेले कार्यकर्ते नाना पळसकर यांनी यासाठी पुढाकार घेतला होता. ग्रामपंचायत सभागृहात नाना पळसकरांनी यात्रेतील सर्वांचे स्वागत केले. कॉ. ॲड. अभय टाकसाळ, कॉ. कैलाश कांबळे, कॉ. राम बाहेती यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले व भूमिका स्पष्ट केली. नाना पळसकर हे शिवसैनिक व तंटामुक्तीचे अध्यक्षही आहेत तर गणेश पळसकर हे उपसरपंच आहेत. पळशीच्या शेतकऱ्यांनी आजपर्यंत केलेला लढा सांगितला परंतु त्यांची प्रशासनाकडून दिशाभूल होत असल्याचेही सांगितले. पळशी शहरानंतर सावंगी हर्सूल गावात संध्याकाळी यात्रा पोहचली. तेथेही चहापानादरम्यान शेतकऱ्यांनी त्यांच्या व्यथा सांगितल्या. येथील बैठकीस शेषराव, बाळू, संजय व मधुकर जगदाळे, भाऊसाहेब कोमते आदी मंडळी उपस्थित होती. सागंवी हर्सूलनंतर ही यात्रा नायगाव या मोठ्या गावात पोहचली. मस्लीम बहुसंख्य असणाऱ्या भागात सभाही घेण्यात आली. सुमारे दीड तासभर सभा झाली. शेख रईस महेबूब, शेख जाफर, मसजिद अब्बास शेख कय्युम आदी शेतकऱ्यांनी यावेळी संवाद साधला. सभेनंतर रात्रीचे १० वाजत आल्यामुळे औरंगाबाद तालुक्यातील उर्वरित

गावे दुसरे दिवशी ४ मार्च रोजी करण्यात आली.

ओव्हर, जटवाडा, जोगवाडा, रहाळपट्टी तांडा, चिमनपूर, अब्दीमंडी, माळीवाडा या औरंगाबाद तालुक्यातील गावांत ४ मार्च रोजी दुपारपर्यंत यात्रा फिरली. जमीन मोजणीसाठी आले तर दंडूका घेऊन पळवून लावू अशी देविदास उदा चव्हाण या रहाळपट्टी तांड्यावरील शेतकऱ्याने संतप्त प्रतिक्रिया दिली तर बागायती जमीन, विहीर, झाडे उद्ध्वस्त होत असल्यामुळे आम्ही विरोध करणार असे गबरू मांगीलाल राठोड, बाबू भिका चव्हाण, शंकर लक्कू चव्हाण आदींनी सांगितले. जोगवाडाच्या वाघमारे मंडळींनीही महामार्गासाठी जमीन देण्यास विरोध केला तर चिमनपूरच्या बऱ्याच शेतकऱ्यांच्या दिशाभूल करून संमतीपत्रावर सह्या घेतल्याचे निदर्शनास आले.

**माळीवाड्यास जिल्हाधिकाऱ्यांना विचारला जाब!**

चिमणपूर नंतर अब्दीमंडी (दौलताबाद किल्ला) करीत माळीवाडा येथे यात्रा पोहचल्यावर तेथील बाधित शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष शेतात येण्याची विनंती यात्रेतील कार्यकर्त्यांना केली. त्यानुसार माळीवाडा शिवारातील उद्ध्वस्त होणाऱ्या शेतातही कार्यकर्ते पोहचले! सूर्यभान रंगनाथ पल्हाळ यांच्या चिकूच्या बागेत १९९१ पासूनची ५०० चिकूची झाडे आहेत. यातून त्यांना वर्षाचे १० ते १५ लाख रुपये उत्पन्न होते. याशिवाय अंजीराच्या बागेतून होणारे उत्पन्न वेगळे. मात्र २६ वर्षांची व मोठाली खोडं झालेली ही सर्व झाडे आता समृद्धी महामार्गामुळे उद्ध्वस्त होणार असल्याचे सांगताना सूर्यभान पल्हाळ यांच्या डोळ्यात पाणी आले. सुभाष बरडे, गंगाधर मुळे आदी शेतकऱ्यांनीही आपल्या व्यथा मळ्यातच सांगितली. प्रत्यक्ष मळा पाहून आल्यावर माळीवाडा ग्रामपंचायत सभागृहात शेतकऱ्यांची बैठक घेण्यात आली. बैठक चालू असतानाच कलेक्टर निधी पांडेय मॅडम पिके विम्याच्या बैठकीसाठी माळीवाडा येथे येत असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे १-२ जणांनी आमची बैठक आटोपती घेण्याचीही सूचना केली. मात्र जमीनच नसल्यावर पीक नाही व पीक नसल्यावर विमाही नाही असे म्हणून काही जणांनी सूचना करणाऱ्याला रोखले व बैठक चालूच ठेवण्यात आली. पीक विम्याचे केंद्रीय पथक माळीवाड्यास ४ मार्च रोजी येणार असल्याने कलेक्टर मॅडमही माळीवाड्यास पोहचल्या तेव्हा कलेक्टर निधी पांडे यांना जनजागरण यात्रेतील कार्यकर्त्यांनी



समृद्धी महामार्गासंबंधी शेतकऱ्यांच्या तक्रारी कानावर घातल्या. निधी पांडे यांनीही भा.क.प., किसान सभेच्या कार्यकर्त्यांचे म्हणणे १० मिनिटे ऐकून घेतले. महामार्गासाठी सक्तीने जमीन घेऊ नये असे आवाहन कलेक्टरना यावेळी करण्यात आले. त्यांनी तक्रारी ऐकून घेतल्या व कलेक्टर ऑफिसमध्ये चर्चेस येण्याचे आवाहन केले. औरंगाबाद तालुक्यातील माळीवाडा हे शेवटचे गाव होते. तेथून पुढे यात्रा सरकली. गंगापूर तालुक्यातील गोकुळवाडी, पेकळवाडी फतियाबाद ही गावे करण्यात आली.

गोकुळवाडी शिवारातील ५० एकर जमीन महामार्गासाठी जाणार असल्याची माहिती कचरू जारवाल यांनी दिली तर ८ कि. मी. अंतरावर असलेल्या रामपूरी-केसापूरी धरणातून पाईप लाईनने पाणी आणून फुलवला जाणारा २ एकरचा मळा या महामार्गातून चालल्याची खंत पेकळवाडीच्या भागीनाक जाधवनी बोलून दाखवली. त्यांचे शेतातीलच आर.सी.सी.चे नवीन घरही जाणार आहे. पेकळवाडीच्याच दत्तु गंगाधर भवर यांची १५ एकर बागायती शेती महामार्गात चालली आहे. कांडेकर, जाधव याही कुटुंबाच्या जमिनी महामार्गात चालल्या आहेत. शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करून समृद्धी कोणाची? हा प्रश्न वारंवार पडत होता! काही ठिकाणी जास्त जमीन जात आहे तर काही जणांजवळ जमीनच कमी असतानाही त्यातील जमीन जात असल्याने व केवळ ५ ते १० गुंठेच शिल्लक राहणार असल्याने त्याचे करायचे काय? हाही प्रश्न पडलेला आहे. कदीमटाकळीला जाण्यापूर्वी पेकळवाडीच्या शिवारात यात्रा काही काळ थांबली, गोकुळ वाडीच्या आश्रमातही काही काळ चहपाण्यासाठी यात्रा थांबली. सरकारची माणसे शेतात परस्पर येतात, मोजणी करतात व सिमेंट कॉंक्रिटची खांबे रोवतात, कागदावर सह्या घेऊन जातात अशा तक्रारी पेकळवाडी व गोकुळवाडीच्या शेतकऱ्यांनी केल्या. नेमकी किती जमीन जाणार, किती पैसा मिळणार, कधी मिळणार आदी प्रश्ने अनुत्तरित असल्याने यात्रेतील कार्यकर्त्यांशी ते भरभरून बोलतात. कळवाडीनंतर ४ मार्चच्या रात्री कदीम टाकळी येथे जाहीर सभा घेण्यात आली. ही जाहीर सभा दोन कारणांमुळे होती. जिल्हा परिषद निवडणुकीत भा.क.प.ला भरभरून मते दिल्याबद्दल ही आभाराची सभा होती. तसेच समृद्धी महामार्गात कदीम टाकळी व टाकळीवाडी या दोन गावच्या ग्रुप ग्रामपंचायत शिवारातील जमीन जात असल्याबाबतही ही सभा होती. लाल बावटा शेतमजूर युनियनचे राज्य कौन्सिल सदस्य, गंगापूर तालुका भा.क.प.चे सहसचिव कॉम्रेड गणेश कसबे यांचे टाकळी हे गाव! कॉ. गणेश कसबे यांनी नुकतीच जिल्हा परिषद निवडणूक ज्या आंबेमोहळ गटातून लढवली त्या गटातील कदीम टाकळी हे मोठे गाव! कॉ. कसबे यांना १४७७ मते या निवडणुकीत मिळाली तसेच कदीम टाकली गावात झालेल्या ६५० मतदांनापैकी ४२५ मते कॉ. कसबेंना मिळाली. ग्रुप ग्रामपंचायत असलेल्या कदीम टाकळी

प्रमाणे टाकळीवाडी गावातही २४० पैकी १५३ मते कसबेंना मिळाली. या दोन्हीही गावात भा.क.प. व कॉ. कसबे अव्वल स्थानावर राहिल्यामुळे ही आभाराचीही सभा होती. समृद्धी महामार्गात कदीम टाकळी, टाकळीवाडी या गावांतील जमीन जाणार आहे. म्हणूनही ही सभा होती. ४ मार्चच्या रात्री १० वाजेपर्यंत सुमारे २ तास चाललेल्या सभेस मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते. कॉ. राम बाहेती, कॉ. कैलाश कांबळे, कॉ. अभय टाकसाळ यांची या सभेत जोरदार भाषणे झाली. पैशाच्या जोरावर निवणुका लढवल्या जातात. मतदारांना आमिषे दाखवली जातात. अशा काळातही कॉ. गणेश कसबे सारख्या कार्यकर्त्यास कदीम टाकळी व टाकळीवाडीच्या मतदारांनी भरभरून मते दिली, पैशाने आम्ही विकले जात नाहीत हे दाखवून दिले याबद्दल या दोन गावातील गावकऱ्यांचे कॉ. बाहेतींनी अभिनंदन केले व आभार मानले. तसेच पराभूत झालो तरी रोजगार हमीचा लढा, समृद्धी महामार्गामुळे होणाऱ्या अत्याचाराविरोधात लढा चालूच राहील अशी ग्वाहीही भाकपने यावेळी दिली. गावातीलच संजू थोरात यांच्या घरी जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. यात्रेच्या तिसऱ्या दिवशी म्हणजे ५ मार्च रोजी सकाळीच टाकळीवाडी गावात यात्रा पोहचली. तेथे गावकऱ्यांशी संवाद साधून, पत्रके वाटून ही यात्रा धामोरीला पोहचली. भाकप, किसान सभा व लाल बावटा शेतमजुरांची युनियन यांची जरी ही जनजागरण यात्रा होती तरी मित्रपक्षांनाही यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यास प्रतिसाद म्हणून श्रमिक मुक्ती दलाचे नेते कॉ. सुखदेव बन, शेतकरी कृती समितीचे कल्याण दुबीये यांनी धामोरी येथे येऊन यात्रेस भेट दिली व शुभेच्छा दिल्या! स्वराज्य अभियानचे व असंघटित कष्टकऱ्यांचे नेते साथी सुभाष लोमटे यांनी यात्रेला शुभेच्छा देणारा संदेश पाठवला होता.

**कॉ. कचरू पाटील डोणगावकरांचे स्मरण!**

धामोरीनंतर ही यात्रा डोणगाव या गावात पोहचली. डोणगाव हे प्रस्थ असणाऱ्यांचे गाव. काँग्रेसनंतर राष्ट्रवादीत गेलेले माजी खासदार दिवंगत साहेबराव पाटील डोणगावकर यांचे हे गाव! त्यांचे चिरंजीव कृष्णा पाटील डोणगावकर यांनी नुकतीच शिवसेनेची वाट धरली! कृष्णा पाटीलचे आजोबा मात्र भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते नेते होते. कॉम्रेड कचरू पाटील डोणगावकर त्यांचे नाव! मरेपर्यंत खांद्यावरील लाल बावटा त्यांनी सोडला नाही. वाळूज लोकल बोर्डाचे अध्यक्ष म्हणूनही ते भा.क.प.च्या वतीने निवडून आले होते. अशा कॉम्रेड कचरू पाटील डोणगावकरांच्या डोणगावला यात्रा पोहचली. गावातून अनाऊन्सिंग करीत गाडी फिरली, पत्रके वाटण्यात आली, एके ठिकाणी छोटीशी सभाही झाली. दिलीप नवले, गोविंद आहेर, राजेंद्र म्हस्के, जयराम गायकवाड, गोपिका बाई म्हल्हारी आदी २५-३० शेतकऱ्यांनी जमीन जात असल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. सभेनंतर व शेतकऱ्यांशी झालेल्या चर्चेनंतर यात्रेतील सर्व कार्यकर्त्यांनी कॉम्रेड कचरू पाटील डोणगावकरांचे घर गाठले. त्यांचे नातू शिवसेनामय झालेले. राष्ट्रवादीवाले कृष्णा पाटील कधीतरी गावात येतात. कॉ. कचरू पाटलांचे चिरंजीव दिवंगत माजी खा. साहेबराव पाटलांनी औरंगाबादला खडेश्वर भागात फार वर्षांपूर्वी बांधलेल्या भल्या मोठ्या बंगल्यातच त्यांचे वास्तव्य असते. आमदारकीची, जि.प.ची, बाजार समितीची, कारखान्याची इ. निवडणुका लढवण्यासाठीही त्यांचे जाणे-येणे असते! कॉम्रेड कचरू पाटील डोणगावकर मात्र डोणगावातच शेवटपर्यंत राहिले. त्यांच्या घरी गेल्यावर समोरच त्यांचा फोटो दिसला. मोबाईलचे कॅमेरे क्लिक झाले. घरात कोणीही नाही, घर संभाळणाऱ्या एका व्यक्तीशिवाय. कॉम्रेड कचरू पाटील लालसलाम!, कॉम्रेड कचरू पाटील, तुमचा वारसा पोराने किंवा नातवाने चालवला नसला तरी आम्ही तुमच्या विचारांचा, कार्याचा वारसा चालवत आहोत असे मनात आणून सर्वांनी कॉम्रेड कचरू पाटलांचे स्मरण केले. त्यांना मनोमन सलाम ठोकला. गंगापूर तालुक्यातील बाधित गावांपैकी डोणगाव हे एक बाधित गाव. समृद्धी महामार्गात जमीन जात असताना कॉ. कचरू पाटलांचे नातू कृष्णा पाटील डोणगावकर मात्र शांत आहेत. कॉ. कचरू पाटील आज असते तर...?

डोणगाव झाल्यानंतर ही यात्रा वैजापूर तालुक्यात शिरली. लासूरगाव या गावात यात्रा पोहचल्यावर तेथेही पत्रके वाटप, काही शेतकऱ्यांशी चर्चा झाली. महेश कोटकर हा न्यू हायस्कूल वैजापूर येथील तरुण, संवेदनशील शिक्षक भेटला, बोलला. त्यांचे शिक्षक मित्र शेजूळ सर यांच्याशीही त्यांनी फोनवर बोलणे करून दिले. दोघांनीही चांगला प्रतिसाद दिला. डी.सी.सी. बँकेतील कर्मचारी आनंद देशमुखही सहभागी झाले. दगडू नेटके, शेखर देशमुख, विलास हिरचंद्र, तुकाराम दुधाळ आदी शेतकरी जमा झाले. लासूरगावात ४० ते ५० एकर जमीन समृद्धी महामार्गात चालल्याचे त्यांच्याकडून समजले. सहारा हॉटेल हे अमोल नळेचेही हॉटेल व शेतजमीन चालल्याचे अमोलने सांगितले. लासूरगावानंतर हडसपिंपळगाव, बडसपिंपळगावात यात्रा पोहचली. तेव्हा काकासाहेब निगोटे, सरपंच नारायण मारूती, रामेश्वर निगोटे आदींनी पिंपळगावातील ६० ते ७० एकर जमीन जाणार असल्याचे सांगितले. पिंपळगाव नंतर वैजापूर ग्रामीण करीत सायंकाळी ४.३० वा. वैजापूरात ही यात्रा पोहचली. तेथे पत्रकार परिषद आयोजिण्यात आली होती. यात्रेदरम्यान फोनवरच निरोप देऊनही वैजापूरातील पत्रकार परिषद चांगली झाली. ६-७ वर्तमानपत्रांनी ही परिषद 'कव्हर' केली. शिवाय लॉर्ड बुद्धा टी.व्ही.नेही! 'लोकांचे मत' असा टेंभा मिरवणारे मात्र गप्प होते.

वैजापूर तालुक्यात भाकप - किसान सभा शेतमजूर युनियनचे काम नसतानाही तेथील पत्रकारांनी या यात्रेस चांगली प्रसिद्धी

Annual Subscription Rs. 250/-
On dated Friday-Saturday
Published On dated Thursday (16-03-2017)

WPP Licence No. MR/TECH/WPP-16/SOUTH/2017
Licence to Post without pre payment
at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai - 1
R. No. 1902/57 Regd. No. MCS/013/2015-17

दिली. ग्रामीण भागातील पत्रकारांच्याबद्दलचे काहींच्या मनात असलेले अपसमजही त्यामुळे दूर झाले. या ज्वलंत प्रश्नावर पत्रकारांनी अनेक प्रश्न यावेळी उपस्थित केले, यात्रेचा हेतू समजावून घेतला. यावेळी शेकापचे ज्ञानेश्वर घोडकेही आलेले होते. शिवूर येथील अंगणवाडी कार्यकर्त्या शालिनी पगारेचे पती संजय पगारे यांचीही यासाठी मोलाची मदत झाली. वैजापूरच्या पत्रकार परिषदेनंतर यात्रा दहेगावकडे निघाली. पुरोगामी चळवळीतील पुस्तकांची विक्री करणारा व रसवंतीमध्ये काम करणारा गणेश शेलार हा तरुण मुलगा लाल झेंड्याची जीप पाहताच जवळ आला. लाल सलाम केला. ओळख नाही पण लाल झेंडा हीच ओळख. सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाचे कॉ. किशोर ढमाले, कॉ. प्रतिमा परदेशी तसेच कॉ. के. टी. उपदेशे यांची ओळख त्याने सांगितली. मुक्कामाचा आग्रहही केला. तेथेच चहा घेऊन गाडीत सर्वजण बसले असतानाच मोटारसायकलवर आलेल्या दोघांनी चर्चेसाठी उतरवले. ज्ञानेश्वर कुमावत त्यांचे नाव. पालखेडचे शेतकरी. पुन्हा चहा पीत त्याच हॉटेलमध्ये एक तास बसलो. सर्वजण कुमावत यांच्याकडून बऱ्याच बाबी समजल्या! शेतकऱ्यांची दिशाभूल करण्यात येत असल्याचे ते म्हणाले. एकरी १ कोटी ३० लाख रुपये भाव देण्यात येणार असल्याचे शेतकऱ्यांना खोटे सांगण्यात येत असल्याचे ते म्हणाले. बोरदहेगाव मध्यम प्रकल्पासाठी ५८ एकर जमीन यापूर्वीच संपादित केल्याचे व मोबदला न मिळाल्याचे त्यांनी सांगितले. चोवाल गाव ते खंडाळा या रस्त्यासाठी संपादित झालेल्या जमिनीचा अद्यापही मोबदला देण्यात आलेला नसल्याचेही कुमावत यांनी अत्यंत उद्विग्न होऊन सांगितले. मध्यम प्रकल्पासाठी जमीन संपादित केल्यामुळे त्यांनी पाळखेडला जमीन घेतली. आता समृद्धी महामार्गात त्यांची पालखेडचीही जमीन चालल्याने ते अतिशय हताश झाले आहेत. पालखेडची सुमारे ७० एकर जमीन समृद्धी महामार्गात चालल्याचे कुमावत सांगत होते. लाल झेंड्याच्या जनजागरण यात्रेमुळे त्यांना लढण्याची उर्मी मात्र निर्माण झाली. समृद्धीसाठी जमीन देण्यास त्यांचा व इतरांचा विरोध आहे. किती दिवस शेतकऱ्याने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी चिरत राहायचे हा कुमावतांचा प्रश्न आहे. हीच आहे का समृद्धी? असेही ते विचारतात. जनजागरण याचेद्वारे आमचे दुःख जाणून घेण्यास तुम्हीच पहिल्यांदा आला. बरे वाटले अशी प्रतिक्रियाही कुमावतांनी दिली. औरंगाबाद जिल्ह्यातील ३ तालुक्यांतील सुमारे ५० गावांत फिरलेल्या या जनजागरण व शोधयात्रेत भा.क.प., किसान सभा व शेतमजूर युनियनच्या कार्यकर्त्यांना विविध अनुभव आले, काही मुद्दे समोर आले. काही ठिकाणी शेतकरी हवालदिल झालेले दिसले तर काही ठिकाणी लढण्याची जिद्द असणारेही दिसले. ज्यांची जमीन चाललीय ते त्रस्त आहेत तर ज्यांची जमीन चाललेली नाही त्यांच्यापैकी काहींना मात्र मनस्वी गुदगुदल्या होताहेत, महामार्गाजवळ त्यांची जमीन येत असल्याच्या भ्रमात मोजणीसाठी खांबे/दगड रोवण्यात आले व दगड रोवलेच्या कागदावर सह्या घेण्यात आल्या. खरेतर संमतीपत्रावरच दिशाभूल करून सह्या घेण्यात आल्या असे काही जण म्हणाले. कितीही विरोध केला तरी जमीन जाणारच आहे असे म्हणणारेही काही होते तर जमिनीत पाय ठेवला तर दंडुक्याने मारेन असे म्हणणारेही काही होते. आपलीच भाषा बोलणारे व आपल्यातीलच माणसे 'एजंट' म्हणून येतात व महामार्गासाठी जमीन देणे कसे फायद्याचे आहे ते सांगतात. असेही एजंट २-३ गावांत निदर्शनास आले. 'भूसंपादन नव्हे, भूसंचयन आहे. तुम्ही आजही मालक उद्याही मालक! भागीदार हा कोट्यवधीश व्हा!!' असे सरकारी पोस्टर्सही फेरण जळगाव ग्रामपंचायतीवर डकवलेले दिसले. पूर्वीचाच नागपूर-मुंबई रस्ता असताना नवीन रस्ता कशाला? पूर्वीच अनेकदा जमीन संपादित केली आता पुन्हा कशाला? पूर्वीचाच मोबदला कधी देणार? नवीन समृद्धी महामार्गाने ६ तासांत मुंबईला कोणाला पोहचायचे आहे? समृद्धी कोणाची? कोणासाठी? विकास कोणाचा? शेतकऱ्यांना देशोधडीला लावून त्यांचे उदरनिर्वाहाचे साधन बळजबरीने हिसकावून घेऊन कोणाचा विकास साधायचाय? कोणाच्या खांद्यावर कोणाचे ओझे? महामार्गासाठी ८ हजार हेक्टर जमीन लागत असेल तर २१ हजार हेक्टर का घेतली जात आहे? नोडस् व टाऊनशिप, नवनगरे कशासाठी? आदी अनंत प्रश्न या यात्रेतून समोर आले. किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ. अशोक जाधव, जिल्हा सचिव कॉ. कैलास कांबळे, शेतमजूर युनियनचे राज्य कौन्सिल सदस्य कॉ. गणेश कसबे, कॉ. विठ्ठल आव्हाढ, कॉ. ॲड. अभय टाकसाळ, कॉ. प्रितम घणघावे, कॉ. विकास गायकवाड, कॉ. ॲड्. अयास शेख, कॉ. भीमराज कसबे, कॉ. रमेश व कॉ. राम बाहेती हे यात्रेत सहभागी झाले होते. पत्रके वाटणे, शेतकऱ्यांशी चर्चा करणे, फळबागांना भेटी देणे, कॉर्नर सभा घेणे, मोठ्या सभा घेणे, शेतकऱ्यांच्या बैठका घेणे, निवेदने कागदपत्रे तपासणे, फोन नंबर जमा करणे आदी कामे यात्रेतील तरुण कार्यकर्ते करीत होते. 'उठा है इन्सान जमाना बदल रहा, जागा है इन्सान जमाना बदल रहा...' हे गीत तर कधी 'ले मशाले चल पडे है लोग मेरे गांवके...' हे गीत गुणगुणत होती. गीत गुणगुणता प्रश्नही विचारत होती – खरंच हा माणूस जागा झालाय? की त्याला जागे करण्यास आपण कमी पडतोय?

**- कॉ. प्रा. राम बाहेती**

भारतीय कम्युनिस्ट पक्ष, महाराष्ट्र राज्य कौन्सिलच्या मालकीचे 'युगांतर' हे साप्ताहिक गोविंद अनंत पाटकर, मुद्रक यांनी न्यू एज प्रिंटिंग प्रेस, भुपेश गुप्ता भवन, ८५ सयानी रोड, प्रभादेवी मुंबई ४०००२५ येथे छापून गोविंद अनंत पाटकर, प्रकाशक यांनी राजभुवन ३१४, एस. व्ही. पी. रोड, मुंबई ४००००४ येथून प्रकाशित केले. संपादक भालचंद्र खं. कानगो.
'Yugantar' weekly owned by Communist Party of India Maharashtra State Council, is Printed by Govind Anant Patkar, Printer, at New Age Printing Press, Bhupesh Gupta Bhavan, 85 Sayani Road, Prabadevi, Mumbai-400025 and published by Govind Anant Patkar, Publisher at 314, Rajbhawan, S.V.P. Road, Mumbai 400004. Editor : Bhalchandra K. Kango.